दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ४४ । सोमवार २३ नोव्हेंबर २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

बोगस शिक्षक भरती :
२१८ शिक्षक-कर्मचाऱ्यांची सेवा खंडित

बीड : जिल्ह्यातील कथित बोगस शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भरती प्रकरणात शिक्षण विभागाने मोठी कारवाई केली आहे. आतापर्यंत तब्बल २१८ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवा खंडित करण्याचा निर्णय छत्रपती संभाजीनगर येथील शिक्षण उपसंचालकांनी घेतल्याची माहिती तक्रारदार इंजि. सादेक इनामदार यांनी दिली. यामध्ये माध्यमिक विभागातील २११, तर प्राथमिक विभागातील सात कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. यासंदर्भात १८ नोव्हेंबर २०२६ रोजी आदेश काढण्यात आल्याचे सांगण्यात येते.बीड जिल्ह्यात मागील पाच ते सात वर्षांत खासगी शिक्षण संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमित भरती झाल्याच्या तक्रारी होत्या. शासनाची नियमित भरती प्रक्रिया बंद असतानाही आर्थिक देवाणघेवाण करून नियुक्त्या केल्याचा आरोप आहे. काही ठिकाणी जुन्या तारखांचे नियुक्ती आदेश दाखवून भरती केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणाचा दैनिक 'पुढारी'ने सातत्याने पाठपुरावा केला होता. शासनाने विशेष तपास पथक नियुक्त करून चौकशीचे आदेश दिले. आता या कारवाईनंतर संबंधित अधिकारी, संस्थाचालक आणि अन्य दोषींवर काय कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.

महत्त्वाचे..

आजारपण, प्रसूती लाभांसाठी स्वतंत्र अर्जाची गरज नाही

नवी दिल्ली : राज्य कर्मचारी विमा महामंडळाच्या (इएससीआय) विमा संरक्षणाखाली असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. आता पात्र कर्मचाऱ्यांना आजारपण आणि प्रसूतीविषयक लाभ मिळवण्यासाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही. नवीन नियम नुसार, पात्रतेच्या अटी पूर्ण झाल्यानंतर लाभाची रक्कम थेट कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.'एम्प्लॉयीज स्टेट इन्शुरन्स (जनरल) रेग्युलेशन्स, २०२६' अंतर्गत हा बदल करण्यात आला असून, १९५० पासून लागू असलेल्या जुन्या नियमांची जागा नवीन नियमावली घेणार आहे. यासाठी कर्मचाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र ईएसआयसीच्या ऑनलाइन प्रणालीतून जारी झालेले असणे, नियोक्त्याने मासिक विवरणपत्रे पोर्टलवर सादर केलेली असणे आणि कर्मचाऱ्याचा विमा क्रमांक व बँक खाते आधारशी जोडलेले असणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे कागदपत्रांचा त्रास कमी होऊन लाभ वितरण प्रक्रिया सुलभ होणार आहे.

शेतकऱ्यांच्या दारात वसुलीला गेलात तर याद राखा!

मुख्यमंत्र्यांचा आदेश धुडकावणाऱ्या बँकांना राष्ट्रवादीचा इशारा; शशिकांत शिंदे आक्रमक

- दुष्काळी परिस्थितीची जेऊरमध्ये पाहणी
- शेतकऱ्यांना एक लाखांची मदत देण्याची मागणी
- कर्जमाफीसाठी सरकारला कर्ज काढायला पाठिंबा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना बँका आणि फायनान्स कंपन्यांचे अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या आदेशालाही जुमानत नसल्याचे चित्र आहे. कर्जवसुलीसाठी थेट शेतकऱ्यांच्या दारात जाऊन जप्तीची कारवाई केली जात आहे. मुख्यमंत्र्यांचा आदेश धुडकावणाऱ्या अशा बँक अधिकाऱ्यांना यापुढे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष जशास तसे उत्तर देईल, असा आक्रमक इशारा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिला. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाला बँका जुमानत नसतील तर राज्य सरकारचा धाक नेमका आहे तरी कुठे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी रविवारी अहिल्यानगर तालुक्यातील जेऊर परिसराला भेट देऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. विष्णू जरे या शेतकऱ्याच्या घरी त्यांनी भोजनही केले. खासदार नीलेश लंके, राष्ट्रवादीचे दक्षिण जिल्हाध्यक्ष सिताराम काकडे, उत्तर जिल्हाध्यक्ष संदीप वर्पे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.





नीलेश लंके यांचा नागरी सत्कार

खासदार नीलेश लंके यांची अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे (शिंदे गट) माजी खासदार सदाशिव लोखंडे, जिल्हा परिषद माजी सदस्य हर्षदा काकडे, बाबासाहेब भोस यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

पाहणीनंतर पत्रकारांशी बोलताना शिंदे यांनी राज्य सरकारच्या शेतकरी मदत धोरणावर जोरदार टीका केली. ते म्हणाले, राज्य सरकारने कर्जमाफी दिली असली तरी यंदाच्या दुष्काळामुळे शेतकरी पुन्हा कर्जाच्या खाईत लोटला जाऊ नये, यासाठी सरकारने आणखी कर्ज काढण्याची वेळ आली तरी काढावे. आगामी हिवाळी अधिवेशनात असा प्रस्ताव आणल्यास विरोधी पक्षात असूनही आम्ही त्याला पाठिंबा देऊ.

शेतकऱ्यांना दिली जाणारी पाच हजार रुपयांची मदत अत्यंत तोकडी असून किमान एक लाख रुपयांची मदत मिळाली पाहिजे. प्रत्यक्ष शेतकऱ्यांचे किती नुकसान झाले आहे, याचा विचार करून मदतीचे धोरण ठरवावे. केवळ हेक्टरी मदत देऊन चालणार नाही. सरकार निकष आणि नियमांच्या नावाखाली वेळकाढूपणा करत राहिले, तर मदत मिळेपर्यंत दुसरा पावसाळा उजाडेल, अशी टीका त्यांनी केली.

कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांच्या घरी जाणाऱ्या एका बँक अधिकाऱ्याशी आपण संपर्क साधला असता, मुख्यमंत्र्यांनी केवळ शेती कर्जाच्या वसुलीला स्थगिती दिल्याचे उत्तर मिळाले. बँका अशा पळवाटा काढत **पान ४ वर)**

अनुदानित शाळांची मनमानी फीवसुली सुरूच!

फी थकली म्हणून विद्यार्थ्यांची अडवणूक, अपमानास्पद वागणूक; पालकांमधून तीव्र संताप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : शिक्षण हे विद्यार्थ्यांचे हक्काचे क्षेत्र असताना काही शैक्षणिक संस्थांकडून फीवसुलीच्या नावाखाली विद्यार्थ्यांची अडवणूक होत असल्याचे धक्कादायक प्रकार श्रीरामपूर तालुक्यात समोर येत आहेत. विशेषतः अनुदानित खासगी शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडून मनमानी पद्धतीने शुल्क आकारले जात असल्याच्या पालकांच्या तक्रारी आहेत. फी भरण्यास विलंब झाल्यास विद्यार्थ्यांना वर्गात उभे करणे, शैक्षणिक व इतर उपक्रमांपासून दूर ठेवणे, परीक्षा फॉर्म भरण्यास अडथळे आणणे, निकाल रोखणे तसेच विद्यार्थी व पालकांना अपमानास्पद वागणूक देण्याचे प्रकार घडत असल्याचा आरोप आहे.

शिक्षणमंत्र्यांच्या इशाऱ्याला श्रीरामपुरात केराची टोपली?



राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शाळांच्या अवाजवी शुल्कवसुलीबाबत कठोर भूमिका घेतली आहे. शाळांना मंजूर शुल्करचनेपेक्षा अधिक पैसे आकारता येणार नाहीत. अशा प्रकारच्या तक्रारी पालकांनी थेट कराव्यात, संबंधित शाळांची चौकशी करून कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. मात्र, श्रीरामपूर तालुक्यातील काही शाळांमध्ये परिस्थिती बदलताना दिसत नसल्याने शिक्षणमंत्र्यांच्या इशाऱ्याची अंमलबजावणी नेमकी कुठे होते, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम २०११ च्या कलम ५ नुसार शासकीय व अनुदानित शाळांचे शुल्क शासनाकडून नियंत्रित केले जाते. मंजूर शुल्कापेक्षा अधिक रक्कम वसूल करण्यास कायद्याने मनाई आहे. तसेच शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार आहे. या कायद्यात विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा व मानसिक त्रास देण्यासही प्रतिबंध आहे.शिक्षणसंस्था या विद्यार्थ्यांच्या भवितव्य घडविणाऱ्या संस्था आहेत की फीवसुलीसाठी दबाव आणणारी केंद्रे, असा सवाल पालक उपस्थित करत आहेत. शिक्षण विभागाने श्रीरामपूर तालुक्यातील शाळांच्या शुल्करचनेची तपासणी करून तक्रारींची निष्पक्ष चौकशी करावी आणि दोषी संस्थांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

फॉर्च्युनर दरीत कोसळल्याने उद्योजक बेंडखळे यांचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



रायगड : जिल्ह्यातील ताम्हिणी घाट परिसरात सुमारे १२०० फूट खोल दरीत फॉर्च्युनर कार कोसळून झालेल्या भीषण अपघातात गोरेगाव येथील प्रसिद्ध उद्योजक श्रीनिवास बेंडखळे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

शनिवारी पहाटेपासून श्रीनिवास बेंडखळे आपल्या कारसह बेपत्ता झाल्याने कुटुंबीयांकडून आणि पोलिसांकडून त्यांचा शोध सुरू होता. पोलिसांनी तांत्रिक तपास आणि मोबाईल लोकेशनची माहिती घेतल्यानंतर त्यांचे शेवटचे लोकेशन ताम्हिणी घाट परिसरात आढळून आले. त्यानुसार माणगाव पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवत सह्याद्री वन्यजिव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या बचाव पथकाला पाचारण केले.

सुरुवातीला ड्रोन कॅमेऱ्याच्या मदतीने दरीतील परिसराची पाहणी करण्यात आली असता तब्बल १२०० फूट खोल दरीत बेंडखळे यांची फॉर्च्युनर कार अपघातग्रस्त अवस्थेत दिसून आली. पुण्यातील पौड पोलीस ठाण्याचे अधिकारी महेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शोध आणि बचाव कार्य हाती घेण्यात आले. दरीची प्रचंड खोली, दुर्गम उतार आणि रात्रीचा काळोख यामुळे बचाव कार्यात मोठी आव्हाने उभी राहिली होती. मात्र अपघातातील व्यक्तीला वाचवण्याच्या प्रयत्नात बचाव पथकांनी आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने खोल दरीत उतरून मोहीम राबवली.

दुर्दैवाने या भीषण अपघातात श्रीनिवास बेंडखळे यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आणि अथक प्रयत्नांनंतर त्यांचा मृतदेह दरीतून बाहेर काढण्यात आला. उद्योगासोबतच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही सक्रिय असलेल्या बेंडखळे यांच्या निधनामुळे गोरेगाव आणि रायगड जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत असून, या अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

देश संसदेतून चालेल परदेशातून नाही...

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहील्यानगर : लोकतंत्र बचाव भीडतंत्र हटाव महारॅली हे कोणतेही शक्तीप्रदर्शन नाही.लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण करण्याचा हा निर्धार आहे.हा देश संसदेतून चालेल परदेशातून नाही.तुमच्या धाक दडपशाहीला देशातील जनता थारा देणार नाही असा इशारा जलसंपदा तथा पालक मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिला.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने अहील्यानगर शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आलेल्या रॅलीचा समारोप दिल्लीगेट येथे जाहीथ सभेने करण्यात आला.सभापती प्रा.राम शिंदे आ.मोनिका राजळे आ.अक्षय कर्डीले भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ सुजय विखे पाटील जिल्ह्याचे चे प्रभारी लक्ष्मण सावजी, उपमहापौर धनंजय जाधव भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग शहराचे अध्यक्ष अनिल मोहिते उतरचे नितीन दिनकर यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकरी कार्यकर्ते नागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील यांनी कॉग्रेस नेते राहूल गांधी यांच्यावर सडकून टिका केली.वर्षानुवर्ष देशात कॉग्रेसची राजवट होती.

पण त्यांना संविधान दिन साजरा करावासा वाटला नाही. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांनी

देशात संविधान दिन साजरा करण्याचा निर्णय करून भारताच्या संविधाना प्रति असलेला आदर दाखवून दिल्याकडे लक्ष वेधून अहील्यानगर जिल्हा आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाते खूप वेगळे होते.त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या



भाजपची भीडतंत्र हटाव महरॅली : धाक दडपशाहीला देशातील जनता थारा देणार नाही : विखे पाटील

या भूमीतून कॉग्रेसला इशारा देतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की, हा देश संविधानाच्या आधाराने पुढे जाईल..तुमच्या धाक दडपशाहीने नाही. मागील काही दिवसात या देशामध्ये कॉग्रेस आणि त्यांच्या काही मित्र पक्षांनी संविधानाच्या नावाखाली केवळ अराजक माजवून देशातील वातावरण कलुषित करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे.कॉग्रेसच्या भूमिकेला आता कोणताही आधार राहीलेला नाही. ज्यांच्याकडे कोणताही विचार आता शिल्लक नाही. सातत्याने निवडणुकांमध्ये होत असलेल्या पराभवाने कॉग्सेस नेते हतबल झाले आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मागील बारा वर्षात देशाने सर्वच क्षेत्रामध्ये केलेल्या प्रगतीमुळे भारत देश महासतेच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत होत आहे.पण काही परदेशी शक्तीना हे पाहावत नाही.म्हणूनच परदेशी शक्तीच्या जोरावर देशाला बदनाम करण्याचे काम कॉग्रेसकडून सातत्याने सुरू असल्याचा आरोप मंत्री विखे पाटील यांनी केला.

संविधान हातात घेवून राहूल गांधी फिरत आहेत.पण देशातील जनता एवढी दूधखुळी नाही. संविधानाची आजपर्यत कॉग्रेस पक्षाने कशी पायमल्ली केली हे देशाने चांगले ओळखले आहे.

लोकसभेची मागील सर्व अधिवेशन आपण पाहीली.महत्वाच्या विषयावरील एकाही चर्चेत कॉग्रेस पक्ष सहभागी झाला नाही. संविधानाच्या आधारे चर्चा करण्याची मानसिकता कॉग्रेस नेत्यांची नाही. याचाअर्थ कॉग्रेसचा विश्वास संविधान आणि संसदेवर नाही.या रॅलीतून आम्ही त्यांना इशारा देतो, जोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले संविधान आहे तोपर्यत लोकशाहीची लढाई संसदेतच होईल. मात्र रस्त्यावर लढण्याची वेळ आली तरी, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता यासाठी मागे हटणार नाही असा इशारा मंत्री विखे पाटील यांनी दिला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विकसीत भारत घडवायचा आहे. जिथे गरिबाला न्याय मिळेल, शेतकऱ्याला सन्मान मिळेल,युवकांना रोजगार मिळेल आणि प्रत्येक नागरिकाला विकासाच्या संधी मिळतील. राजकारणा पेक्षा राष्ट्रहित महत्वाचे आहे.

संविधानाचा सन्मान करून लोकशाही संस्थांवरील विश्वास अधिक मजबुत करण्यासाठी आपल्या सर्वांना कटीबद्ध व्हावे लागणार असल्याचे मंत्री विखे यांनी शेवटी सांगितले.

- सभापती प्रा.राम शिंदे यांनी आपल्या भाषणात अतिशय त्यागातून मिळालेले स्वातंत्र्य लोकशाही मध्ये परावर्तित झाले आहे. निवडणुकांमध्ये पराभव होतो.लोकांना विचार पटत नाही तेव्हा विरोधी पक्ष म्हणून सुध्दा भूमिका करता आला पाहीजे. दुर्दैवाने देशात केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संविधानिक संस्थांची बदनामी करण्याचे काम सुरू आहे. जनतेचा कधीच विचार न केलेल्यांना चोख उतर देण्यासाठी ही रॅली असल्याचे सभापती शिंदे यांनी सांगितले. याप्रसंगी आ. मोनिका राजळे, आ.अक्षय कर्डीले, डॉ. सुजय विखे पाटील यांची भाषण झाली.

राजस्थानमध्ये भीषण अपघात पवार कुटुंबातील ९ जणांचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राजस्थान : खाटू श्यामजींचे दर्शन घेऊन महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्याकडे परतणाऱ्या भाविकांच्या क्रूझर गाडीला राजस्थानमध्ये भीषण अपघात झाला. कोटा-उदयपूर महामार्गावरील शंभूपुरा गावाजवळ रविवारी मध्यरात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला क्रूझर गाडीने जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात धुळे जिल्ह्यातील एकाच पवार कुटुंबातील नऊ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर सात जण गंभीर जखमी झाले आहेत. धडक इतकी जोरदार होती की, क्रूझर गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघातानंतर घटनास्थळी एकच हाहाकार उडाला. स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तातडीने मदतकार्य सुरू करून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

मृतदेह बाहेर काढण्यासाठीही बचाव पथकाला प्रयत्न करावे लागले. खाटू श्यामजींच्या दर्शनानंतर आनंदाने घराकडे परतणाऱ्या पवार कुटुंबावर काळाने घाला घातल्याने धुळे जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. एकाच कुटुंबातील नऊ जणांचा मृत्यू झाल्याने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.

पाथर्डीत चैनस्नॅचिंग करणारी टोळी जेरबंद

स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; चौघा आरोपींसह ३ लाख २६ हजारांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : अहिल्यानगर शहरासह पाथर्डी परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका आरोपीसह चोरीचा मुद्देमाल विकत घेणाऱ्या एकाला ताब्यात घेण्यात आले असून, चार चैनस्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी सोन्याचे दागिने, मोटारसायकल आणि मोबाईल असा एकूण ३ लाख २६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

१ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगरम धील लिंकरोड ते गायकेमळा रस्त्यावर स्कुटीवरून जाणाऱ्या दोन महिलांपैकी एका



महिलेच्या गळ्यातील दागिने दुचाकीस्वार चोरट्यांनी बळजबरीने हिसकावून नेले होते. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे केडगाव परिसरातून विनोद ऊर्फ जोल्या जिजाबा भोसले (वय २६, रा. चिखली, ता. आष्टी, जि. बीड) याला ताब्यात घेण्यात आले.चौकशीत त्याने सुमित चव्हाण, रोहित चव्हाण आणि शुभम भोसले या साथीदारांच्या मदतीने गुन्हा केल्याची कबुली दिली. हे तिघे फरार आहेत. पुढील तपासात पाथर्डीतील एक आणि कोतवाली पोलीस ठाण्यातील आणखी दोन असे एकूण चार गुन्हे उघडकीस आले. चोरीचे दागिने विक्रीसाठी स्वीकारणाऱ्या अंबादास पांडुळे (वय ५१, रा. चिखली, जि. बीड) यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे व त्यांच्या पथकाने केली. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

|| उद्या दशक्रियाविधी ||

ऐसा जन्म लाभावा । देहची चंदन व्हावा ।। आयुष्य संपले तरी । सुगंध दरवळत रहावा ।।
पवित्र तुमच्या स्मृती । अनंत तुमची माया ।। नित्य असुद्या आम्हावरती । अखंड तुमची छाया ।।

|| भावपूर्ण श्रद्धांजली ||



कै. भागिरथशेठ माधवराव नागरे

यांचे रविवार दि. १५/११/२०२६ रोजी निधन झाले.
त्यांचा दशक्रियाविधी मंगळवार दि. २४/११/२०२६, सकाळी ८ वा.
ठिकाण : नॉर्दन ब्रँच, संगमनेर रोड, श्रीरामपूर येथे होईल.

❊ शोकाकुल ❊

गं.भा. मंगलबाई भागीरथशेठ नागरे (पत्नी)

सौ. रोहिणी विजय सोनार (मुलगी)
श्री विजय विठ्ठल सोनार (जावई)
सौ. चित्रा वाल्मीक डहाळे (मुलगी)
श्री. वाल्मीक पोपटराव डहाळे (जावई)
सौ. मालती निलेशशेठ देशमुख (मुलगी)
श्री. निलेशशेठ मधुकरशेठ देशमुख (जावई)
श्री. अभिषेक भुलेश्वर नागरे (नातू)
श्री. रमेशशेठ मोहिनीराज नागरे (पुतणे)
श्री. किशोरशेठ राधाकिसन नागरे (पुतणे)
श्री. ज्ञानेश्वरशेठ बाळकिसन नागरे (पुतणे)
चि. ओंकार विजय सोनार (नातू)
चि. व्यंकटेश वाल्मीक डहाळे (नातू)
चि. यशराजे निलेशशेठ देशमुख (नातू)
श्री. सुजित शंकरराव नागरे (नातू)

समस्त नागरे, डहाळे, सोनार, देशमुख
परिवार व आप्तेष्ट नातेवाईक

कणगर येथे उद्यापासून कनकावती माता यात्रा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

ताहाराबाद : राहुरी तालुक्यातील कणगर येथील कनकावती माता यात्रा उत्सव सालाबादप्रमाणे कार्तिक पौर्णिमेच्या पर्वणीत मंगळवार दि. २४ नोव्हेंबर ते बुधवार दि.२५ नोव्हेंबर ह्या कालावधीत संपन्न होत आहे. मंगळवारी सकाळी ७ वा. गंगाजल पूजन व त्यानंतर देवीचा अभिषेक कणगर गावचे भूमिपुत्र,अहिल्यानगरचे उपजिल्हाधिकारी सुनील गाढे (निवडणूक शाखा), राहुरीचे तहसीलदार डॉ. अमित पवार व पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. सायंकाळी ७ वा. छबीना मिरवणूक व रात्री ९ वा.लोकनाट्य तमाशा तर बुधवारी सकाळी ९ वा. हजेरीचा कार्यक्रम, दुपारी ४ वा. जंगी कुस्त्याचा हंगामा, सायंकाळी ७ वा. शोभेची दारू काम व रात्री ९ वा. लोकनाट्य तमाशा आदीं कार्यक्रम संपन्न होणार. तरी परिसरातील देवी भक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा समितीच्या व समस्त ग्रामस्थ कणगर यांच्यावतीने करण्यात आले आहे.



सोशल मीडियाचा रिमोट एआयच्या हाती !

मुलांना अश्लील आणि हिंसक मजकुरापासून दूर ठेवण्याचा इन्स्टाग्रामचा निर्णय स्वागतार्ह असला, तरी कोणता मजकूर पाहायचा आणि कोणता दडपायचा, हे ठरवण्याची सत्ता एआयच्या हाती जाणे अभिव्यक्तिस्वातंत्र्यासाठी चिंतेचा विषय आहे. आज मुलांच्या सुरक्षिततेच्या नावाखाली सुरू झालेली ही व्यवस्था उद्या विचारस्वातंत्र्यावर मर्यादा आणणारी ठरू नये, एवढीच अपेक्षा!

==========

तुम्ही मोबाईलवर इन्स्टाग्राम उघडता, तेव्हा तुम्हाला काय दिसते? एखाद्या शेतकऱ्याचा शेतीविषयक व्हिडिओ, एखाद्या नेत्याचे भाषण, मनोरंजनाची रील की एखादी बातमी? तुम्हाला वाटते की तुम्ही स्वतःच्या आवडीनुसार हे सर्व पाहत आहात. पण प्रत्यक्षात तुम्हाला काय दाखवायचे, कोणता व्हिडिओ तुमच्यासमोर आणायचा आणि कोणती पोस्ट तुमच्या नजरेपर्यंत पोहोचू द्यायची नाही, याचा निर्णय मोठ्या प्रमाणात सोशल मीडियाचे अल्गोरिदम घेत असतात. आता या व्यवस्थेत कृत्रिम बुद्धिमत्तेची म्हणजेच एआयची भर पडत आहे. इन्स्टाग्रामने किशोरवयीन मुलांना अश्लील आणि हिंसक मजकुराच्या शिफारसींपासून दूर ठेवण्यासाठी एआयच्या मदतीने नियंत्रण आणण्याचा निर्णय घेतला आहे. मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय स्वागतार्ह आहे; मात्र त्यातून निर्माण होणारे प्रश्न दुर्लक्षित करून चालणार नाहीत.

आज ग्रामीण भागातील एखाद्या छोट्या गावातही स्मार्टफोन पोहोचला आहे. शेतकरी हवामानाचा अंदाज पाहतो, विद्यार्थी अभ्यासाचे व्हिडिओ पाहतो, महिला पाककृती शोधतात, तर तरुण मनोरंजनाबरोबरच रोजगाराच्या संधी शोधतात. सोशल मीडिया हा आता केवळ विरंगुळ्याचा विषय राहिलेला नाही. तो माहिती, शिक्षण, व्यवसाय आणि जनमत तयार करण्याचे प्रभावी माध्यम बनला आहे. अशा परिस्थितीत या माध्यमावर कोणते नियंत्रण असावे, हा प्रश्न प्रत्येक कुटुंबाशी संबंधित आहे. लहान मुलांच्या हातात मोबाईल दिल्यानंतर त्यांच्या समोर कोणता मजकूर येतो, यावर पालकांचे नियंत्रण राहावे, अशी प्रत्येक आई-वडिलांची अपेक्षा असते. अश्लील दृश्ये, हिंसक व्हिडिओ आणि वयाला न शोभणारा मजकूर मुलांपर्यंत पोहोचू नये, यासाठी तंत्रज्ञानाचा वापर होत असेल तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र, मुलांचे संरक्षण करण्याच्या नावाखाली कोणता मजकूर योग्य आणि कोणता अयोग्य, याचा अंतिम निर्णय एका खासगी कंपनीच्या यंत्रणेने घ्यावा का, हा खरा प्रश्न आहे. यापूर्वी एखादी पोस्ट सोशल मीडियाच्या नियमांचे उल्लंघन करत असेल, तर ती हटवली जात होती. संबंधित खाते बंद केले जात होते किंवा त्या वापरकर्त्यावर निर्बंध आणले जात होते. आता मात्र त्यापुढचा टप्पा सुरू झाला आहे. पोस्ट हटवायची नाही; पण ती विशिष्ट व्यक्तींपर्यंत पोहोचू द्यायची नाही. याला डिमोशन किंवा पोस्टची दृश्यता कमी करणे असे म्हणतात. म्हणजेच एखादी पोस्ट अस्तित्वात असली, तरी तिचा प्रसार किती करायचा, हे अल्गोरिदम ठरवणार. एखाद्या गावातील प्रश्नावर केलेली पोस्ट हजारो लोकांपर्यंत पोहोचू शकते किंवा ती पोस्ट कोणाच्याच नजरेस पडणार नाही, अशीही व्यवस्था होऊ शकते. पोस्ट हटवली नाही, म्हणून अभिव्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राहिले, असे म्हणता येणार नाही. अल्गोरिदम म्हणजे नेमके काय? आपण कोणते व्हिडिओ पाहतो, कोणत्या पोस्टला पसंती देतो, कोणत्या विषयावर प्रतिक्रिया देतो आणि कोणत्या मजकुरावर किती वेळ थांबतो, याचा अभ्यास करून संगणकीय यंत्रणा आपल्या आवडीनिवडी ओळखते. त्यानंतर आपल्याला आवडेल अशाच प्रकारचा मजकूर वारंवार दाखवला जातो. उदाहरणार्थ, एखाद्या शेतकऱ्याने शेतीविषयक व्हिडिओ अधिक पाहिले, तर त्याच्या मोबाईलवर शेतीचेच व्हिडिओ अधिक दिसू लागतात. ही सुविधा सोयीची असली, तरी हळूहळू आपण कोणत्या माहितीपासून दूर राहतो आहोत, हे आपल्या लक्षातही येत नाही. आता यामध्ये एआयचा वापर वाढत आहे. एखादा मजकूर अश्लील आहे, हिंसक आहे किंवा आक्षेपार्ह आहे, हे ओळखण्याचे काम एआय करणार आहे. परंतु मानवी भाषा, विनोद, उपरोध आणि सामाजिक संदर्भ समजणे यंत्रासाठी नेहमीच सोपे नसते. विशेषतः मराठीसारख्या प्रादेशिक भाषांमधील बोली, ग्रामीण भाषेतील शब्दप्रयोग आणि स्थानिक संदर्भ यांचा चुकीचा अर्थ लावला जाऊ शकतो. एखाद्याने व्यवस्थेवर केलेली उपरोधिक टीका किंवा सामाजिक प्रश्नावर व्यक्त केलेले मत चुकीने आक्षेपार्ह ठरवले गेले, तर त्या पोस्टची पोहोच कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज मुलांना अश्लील मजकुरापासून वाचवण्यासाठी एआय वापरले जात आहे. उद्या राजकीय भाषणे, सामाजिक चळवळी, सरकारवरील टीका किंवा एखाद्या व्यवस्थेविरोधातील आवाज यांचे वर्गीकरणही याच यंत्रणेने केले तर? कोणता मजकूर दिशाभूल करणारा आहे, कोणता समाजासाठी धोकादायक आहे आणि कोणता केवळ वेगळे मत मांडणारा आहे, हे ठरवण्याचे निकष कोण तयार करणार? त्या निर्णयात चूक झाली तर जबाबदारी कोणाची राहणार? कंपनीची की एआयची? विशेषतः जाहिराती आणि राजकीय प्रचाराच्या बाबतीत हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. एखाद्या विशिष्ट विचाराला अधिक लोकांपर्यंत पोहोचवायचे आणि दुसऱ्या विचाराची दृश्यता कमी करायची, असे घडू लागले तर लोकशाहीतील मुक्त चर्चेवर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सोशल मीडिया कंपन्यांच्या अल्गोरिदमच्या कामकाजात पारदर्शकता असणे आवश्यक आहे. चुकीने मर्यादा आणलेल्या पोस्टविरोधात तक्रार करण्याची आणि मानवी पातळीवर पुनर्तपासणी करून घेण्याची व्यवस्था असली पाहिजे. याचबरोबरम पालकांनीही आपली जबाबदारी केवळ मोबाईलवर नियंत्रण ठेवण्यापुरती मर्यादित ठेवू नये. मुलांशी संवाद साधणे, त्यांना चांगल्या-वाईट मजकुरातील फरक समजावून सांगणे आणि इंटरनेटचा जबाबदारीने वापर करण्याची सवय लावणे गरजेचे आहे. तंत्रज्ञान पालकांची मदत करू शकते; पण पालकांची जागा घेऊ शकत नाही. शेवटी, सोशल मीडिया हे लोकांच्या हातातील संवादाचे माध्यम आहे. त्याचे नियंत्रण पूर्णपणे कंपन्यांच्या किंवा एआयच्या हातात जाणे योग्य ठरणार नाही. मुलांचे संरक्षण, वापरकर्त्यांची सुरक्षितता आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य या तिन्ही गोष्टींचा समतोल राखला पाहिजे. आज एआय आपल्याला काय पाहायचे ते ठरवत आहे; उद्या आपण काय विचार करायचा, हेही तेच ठरवू लागले तर लोकशाहीसमोर नवे संकट उभे राहील. म्हणूनच तंत्रज्ञानाचा वापर माणसाच्या सोयीसाठी असावा, माणसाच्या विचारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नव्हे. मोबाईलचा रिमोट आपल्या हातात आहे की आपणच एआयच्या रिमोटवर चालत आहोत, याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे!

भोकर येथे तुळशी विवाहासोबत गरजू जोडप्याचा विवाह सोहळा

अन्नदानासह नवदाम्पत्याला संसारोपयोगी भांड्यांचा संच भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

भोकर : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथे तुळशी विवाहाचे औचित्य साधून यंदा एका गरजू कुटुंबातील वधू-वरांचा विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. धार्मिक परंपरेसोबत सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या विवाह सोहळ्यात नवदाम्पत्याला कन्यादान म्हणून संसारोपयोगी भांड्यांचा संच भेट देण्यात येणार असून, उपस्थित वऱ्हाडी मंडळींसाठी अन्नदानाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता श्रीक्षेत्र रेणुकामाता मंदिर प्रांगणात हा सोहळा पार पडणार आहे.

भोकर येथील श्री रेणुकामाता आरती ग्रुपने ग्रामस्थांच्या सहकार्याने सुरू केलेल्या तुळशी विवाह सोहळ्याचे यंदा बारावे वर्ष आहे. शारदोत्सव समितीनेही या उपक्रमात सहभाग घेतला आहे. गेल्या अकरा वर्षांपासून धार्मिक कार्यक्रमांसोबत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. यंदा आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू व आदिवासी कुटुंबातील मुला-मुलींच्या विवाहाचा खर्च हलका व्हावा, या उद्देशाने प्रत्यक्ष विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी महावितरणच्या भोकर उपकेंद्राजवळ राहणारे किशोर दशरथ आहेर यांची ज्येष्ठ कन्या राधा आणि वडाळा महादेव येथील रावसाहेब भालेराव यांचे चिरंजीव तुळशीराम यांचा विवाह होणार आहे. या नवदाम्पत्याला प्रतिभा राजेंद्र मते यांच्याकडून भांड्यांचा संच भेट देण्यात येणार आहे. सतीश वाकडे यांच्याकडून विनामूल्य ध्वनिक्षेपक व्यवस्था, कैलास मते यांच्याकडून मंडप सेवा, तर योगेश दंडवते यांच्याकडून पौरोहित्य सेवा दिली जाणार आहे. सरपंच शीतल पटारे, उपसरपंच गिरीश मते आणि ग्रामपंचायत सदस्यांच्या पुढाकारातून विवाहानंतर सर्व उपस्थितांसाठी अन्नदान करण्यात येणार आहे. देवगड संस्थानचे मठाधिपती भास्करगिरीजी महाराज, स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, साहेबराव महाराज कांगुणे, सुदाम महाराज चौधरी, साध्वी आरतीताई शिंदे महाराज, संतोष महाराज पटारे, किरण महाराज हराळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा होणार आहे. या विवाह सोहळ्यास भाविक व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री रेणुकामाता यात्रोत्सव मंडळ, श्री रेणुकामाता आरती ग्रुप आणि समस्त ग्रामस्थांनी केले आहे.

टक्केवारीसाठी हप्तेखोरांची पोलिसांसमोरच दादागिरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : सुसंस्कृत तालुका अशी ओळख असलेल्या संगमनेरची आता टक्केवारीचा तालुका म्हणून ओळख होत आहे. नांदूर शिंगोटे येथील तरुणांनी शासकीय नियमाने घेतलेल्या कामांमध्ये फक्त टक्केवारी आणि हप्ते टोळीसाठी राजापूर मधील काही टवाळखोरांनी त्रास देण्याचा उद्देश सुरू केला असून पोलिसांसमोर केलेली दादागिरी व अरेरावी ही तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे. सायखिंडी फाटा येथे नाशिक - पुणे महामार्गावरील उड्डाणपुलाचे कामात माती पुरवण्याचे काम नांदूर शिंगोटे येथील व्यावसायिकांनी घेतले आहे मात्र तुम्ही बाहेरच्या तालुक्यातील आहात म्हणून येथे काम करायचे नाही अशी अरेरावी राजापूर येथील काही गुंडाळ तरुणांनी केली आहे. ही फक्त टक्केवारीसाठी त्यांची दहशत आहे. संगमनेर आणि सिन्नर तालुका हा कायम समन्वयाने राहिला आहे. नांदूर शिंगोटे गाव हे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात येत असून तेथील शेतकरी,विद्यार्थी,नागरिक यांची संगमनेर मध्ये कायम वर्दळ असते. बंधू भावाचे नाते कायम राहिले आहे. मात्र तालुक्याच्या नावावर दहशत निर्माण करून दोन्ही तालुक्यांमध्ये संबंध बिघडवण्याचे काम काही सत्ताधारी टक्केवारी खोर तरुण करत आहेत. विशेष म्हणजे पोलिसांसमोर हे सगळे घडत असताना पोलीस सर्व बघत आहेत. इतकी दादागिरी करण्यापर्यंत यांची हिम्मत वाढली कशी. पोलीस प्रशासनावर नेमका कोणाचा दबाव आहे. ही टक्केवारी नेमकी कोण घेत आहे. त्यांचा आका कोण आहे याची आता चर्चा तालुक्यात रंगू लागली आहे. मागील दोन वर्षापासून हप्ते खोरी आणि टक्केवारी ही कलंकित संस्कृती संगमनेरला सुरू झाली आहे. या मागचे सूत्रधार आणि आका कोण आहे ते तातडीने शोधावे. याचबरोबर दहशत आणि धाक निर्माण करणाऱ्या अशा तरुणांना पोलीस प्रशासनाने जरब बसवावी अशी मागणी सामान्य नागरिकांमधून होत आहे.

आम्ही कधी कोणाचे नुकसान केले नाही. आम्ही कायदेशीर मार्गाने काम करत आहोत. न्याय बाजूने आम्हाला सर्वांनी समजून घ्यावे. नांदूर शिंगोटे व संगमनेर हे जिव्हाळ्याचे नाते आहे आमचा प्रत्येक नागरिक संगमनेर मध्ये येत असतो आम्ही कुठेही चुकीचे करत नाही मग आम्हाला का त्रास देतात. टक्केवारी साठी आम्हाला वेटीस धरले जात असून सर्व संगमनेर तालुक्यातील जनतेने आम्हाला न्याय द्यावा

दत्ता मुंगसे व समस्त ग्रामस्थ नांदूर शिंगोटे तालुका सिन्नर

बहिरवाडीत २५ नोव्हेंबरपासून कालभैरवनाथ जन्मोत्सव सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तालुक्यातील तीर्थक्षेत्र बहिरवाडी येथे भगवान श्री कालभैरवनाथ जन्मोत्सवानिमित्त बुधवार, २५ नोव्हेंबर ते बुधवार, २ डिसेंबर या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जन्मोत्सव सोहळ्याची तयारी ग्रामस्थांच्या वतीने सुरू आहे. देवगड संस्थानचे महंत राष्ट्रसंत गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज व स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने हा सोहळा होत आहे. हभप रामनाथ महाराज पवार, विजय महाराज पवार, लक्ष्मण महाराज नांगरे, गणेश महाराज तनपुरे व श्री कालभैरवनाथ देवस्थान पब्लिक ट्रस्ट यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहकाळात पहाटे ५ ते ६ काकडा भजन, सकाळी ७.३० ते ११.३० ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ८ ते १० कीर्तन होणार आहे. कीर्तन महोत्सवात ज्ञानेश्वर महाराज हजारे, रामनाथ महाराज पवार, गणेश महाराज तनपुरे, बाळकृष्ण महाराज दिघे, नंदकिशोर महाराज फंदाडे व अंकुश महाराज जगताप यांची कीर्तने होणार आहेत. मंगळवार, १ डिसेंबर रोजी रात्री १० ते १२ नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे महंत हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या कालभैरवनाथ जन्मोत्सव कीर्तनातून जन्मसोहळा साजरा होणार आहे.

सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा

रुग्णसेवेच्या उपक्रमातून माणुसकीचा संदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : गंगापूर नगरीचे नगरसेवक राकेश कळसकर यांच्या वाढदिवसानिमित्त शासकीय रुग्णालय, गंगापूर येथे रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांसह उपस्थित नागरिकांना पुरी-भाजीचे वाटप करण्यात आले. वाढदिवस केवळ आनंदोत्सव म्हणून साजरा न करता समाजातील गरजू आणि रुग्णांची सेवा करण्याच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक जण आपले वाढदिवस विविध पद्धतीने साजरे करतात. मात्र, सामाजिक बांधिलकी जपत रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाइकांना अन्नदान करून वाढदिवस साजरा करण्याचा हा उपक्रम विशेष कौतुकास्पद ठरला. रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांना तसेच रुग्णांसोबत आलेल्या नातेवाइकांना अशा उपक्रमांमुळे मोठा आधार मिळतो. समाजातील प्रत्येक आनंदाच्या क्षणाला सेवाकार्याची जोड मिळाली, तर त्यातून खऱ्या अर्थाने सामाजिक जाणीव अधिक



दृढ होते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

नगरसेवक राकेश कळसकर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या अन्नदान उपक्रमामुळे रुग्णालय परिसरात आपुलकीचे वातावरण निर्माण झाले. सार्वजनिक जीवनात कार्यरत असताना समाजातील सर्वसामान्य नागरिक, गरजू व्यक्ती आणि रुग्ण यांच्याप्रती संवेदनशीलता जपणे महत्त्वाचे असते. याच भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी नगरसेवक आनंद पाटील, मंगेश कळसकर, दत्तू बुचुडे, गोरख जावळे,रुग्ण कल्याण समितीचे सदस्य अतुल रासकर, राजू काटकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. वाढदिवसाच्या निमित्ताने अन्नदानासारखा सेवाभावी उपक्रम राबवून आनंदाचे क्षण समाजासोबत साजरे करण्याचा आदर्श या उपक्रमातून समोर आला. उपस्थित मान्यवरांनीही या उपक्रमात सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली.

लातूर ते शिर्डी साई पालखीचे बाभळेश्वर येथे स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोल्हार : लातूर येथील श्री साईबाबा भक्ती प्रतिष्ठान, विशालनगर येथून श्री क्षेत्र शिर्डीकडे पायी निघालेल्या साई पालखी व दिंडीचे बाभळेश्वर येथे ग्रामस्थांच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. श्री प्रकाश बाबुराव सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली ही पालखी शिर्डीकडे मार्गस्थ झाली आहे.

बाभळेश्वर येथील ग्रामदैवत बिरोबा मंदिरात साई पालखी दर्शनासाठी ठेवण्यात आली होती. यावेळी ग्रामस्थांनी पालखीतील साईभक्तांचे स्वागत केले. साईबाबांची महाआरती करण्यात आली. त्यानंतर दिंडीतील भाविकांनी तयार केलेल्या प्रसादाचा उपस्थितांनी लाभ घेतला.यावेळी दिंडीचे चालक प्रकाश सोनवणे यांनी सांगितले की, साई पालखीचे हे सोळावे वर्ष आहे. १४ नोव्हेंबर रोजी लातूर येथून पालखीचे प्रस्थान झाले. शिर्डीपर्यंतच्या प्रवासात नऊ



ठिकाणी पालखीचा मुक्काम असतो. प्रत्येक ठिकाणी ग्रामस्थांकडून चांगले सहकार्य आणि स्वागत मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रावरील दुष्काळाचे संकट दूर व्हावे, राज्यात चांगला पाऊस पडावा तसेच येणारे २०२७ हे नूतन वर्ष सर्वांसाठी सुख, समृद्धी आणि समाधानाचे जावे, अशी प्रार्थना साईचरणी केल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी पत्रकार प्रमोद कुंभकर्ण यांनी मनोगत व्यक्त केले. दिंडीत सहभागी साईभक्तांनी प्रवासातील अनुभव कथन केले. यावेळी प्रकाश सोनवणे, प्रल्हाद धोत्रे, श्याम पांढरे, बालाजी ईटकर, अशोक आदमाने, अभिषेक सुगरे, गोपाळ धोत्रे, पवन यमकरे, रुक्मिणी सोनवणे, सुकुमार बिरादार, पूजा बनवायला, आदरवाड, वंदना केंडे यांच्यासह अनेक साईभक्त उपस्थित होते.

श्रीगोंद्यात २,६०० रेशनकार्डधारकांचे धान्य बंद !

'मिशन सुधार'चा दणका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : शासनाच्या स्वस्त धान्य योजनेचा लाभ घेणाऱ्या अपात्र लाभार्थ्यांना पुरवठा विभागाने जोरदार दणका दिला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या 'मिशन सुधार' मोहिमेंतर्गत श्रीगोंदा तालुक्यातील तब्बल २ हजार ६०० रेशनकार्डधारकांचा धान्यपुरवठा बंद करण्यात आला आहे. आयकर विवरणपत्र (आयटीआर) भरणारे, चारचाकी वाहनधारक, आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबे तसेच दुबार रेशनकार्डधारकांच्या पडताळणीत ही कारवाई करण्यात आल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. गरिबांच्या ताटात जाणारे धान्य खरोखर गरजूंनाच मिळावे, या उद्देशाने शासनाने रेशनकार्डची तपासणी सुरू केली. या मोहिमेत आर्थिकदृष्ट्या सक्षम असूनही स्वस्त धान्य योजनेचा लाभ घेणाऱ्यांची माहिती विविध शासकीय नोंदींच्या आधारे तपासण्यात आली. आयटीआर भरणारे, चारचाकी वाहने असणारे, विविध फर्मचे संचालक असणारे आणि उत्पन्नाच्या निकषात न बसणारे लाभार्थी प्रशासनाच्या रडारवर आले. एकाच कुटुंबाच्या नावे एकापेक्षा अधिक रेशनकार्ड, कायमस्वरूपी स्थलांतर करूनही रेशनकार्डवरील नावे कायम ठेवणे, आधार व ई-केवायसीमधील त्रुटी अशा बाबीही तपासणीत समोर आल्या. सप्टेंबर २०२५ पासून सुरू असलेल्या या मोहिमेत आतापर्यंत २,६०० रेशनकार्डधारकांचा धान्यपुरवठा खंडित करून त्यांचा समावेश एनपीएच (नॉन प्रायोरिटी हाऊसहोल्ड) प्रवर्गात करण्यात आला आहे.

मात्र, या कारवाईमुळे काही महत्त्वाचे प्रश्नही उपस्थित होत आहेत. खरोखर अपात्र असलेल्यांवर कारवाई झालीच पाहिजे; पण चुकीच्या नोंदी किंवा तांत्रिक त्रुटींमुळे एखाद्या गरजू कुटुंबाचे धान्य बंद झाले तर त्याची जबाबदारी कोण घेणार? धान्य बंद करण्यापूर्वी संबंधितांना नोटीस देण्यात आली का? अपात्रतेच्या निर्णयाविरोधात दाद मागण्याची संधी दिली जाते का? या प्रश्नांची उत्तरेही पुरवठा विभागाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. शासनाच्या धान्य योजनेतील गळती रोखण्यासाठी सुरू झालेली ही मोहीम आता श्रीगोंद्यात चर्चेचा विषय ठरली आहे. खऱ्या गरजूंच्या ताटातील घास सुरक्षित ठेवण्यासाठी अपात्र लाभार्थ्यांवर कारवाई आणि पात्र लाभार्थ्यांना न्याय, या दोन्ही गोष्टी प्रशासनाने तितक्याच गांभीर्याने राबविण्याची गरज आहे.

पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय विज्ञानातून रोजगाराच्या नव्या संधी !

माफसूच्या माध्यमातून शिक्षण, संशोधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याची गरज

भारत हा कृषिप्रधान देश असून शेतीला पशुसंवर्धनाची जोड मिळाल्यास ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम होऊ शकते. शेतीतील अनिश्चितता, हवामान बदल आणि बाजारभावातील चढ-उतार यामुळे शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन आणि अन्य पशुधनावर आधारित व्यवसाय ग्रामीण कुटुंबांच्या उत्पन्नाचे महत्त्वपूर्ण साधन ठरत आहेत. त्यामुळे पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय विज्ञान हे केवळ प्राण्यांच्या उपचारांपुरते मर्यादित नसून रोजगार, संशोधन, उद्योजकता आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे क्षेत्र बनले आहे.

पशुवैद्यकीय विज्ञानामध्ये पशुआरोग्य, रोगनिदान, लसीकरण, शस्त्रक्रिया, प्रजनन व्यवस्थापन, पोषण आणि प्राणी कल्याण अशा विविध विषयांचा समावेश होतो. आधुनिक तंत्रज्ञानामुळे या क्षेत्रात नव्या संधी निर्माण होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान, जनुकीय संशोधन आणि डिजिटल आरोग्य व्यवस्थापनाचा वापर वाढत आहे. मानवी आरोग्य, प्राणी आरोग्य आणि पर्यावरण यांचा परस्परसंबंध लक्षात घेता 'वन हेल्थ' ही संकल्पनाही महत्त्वाची ठरत आहे.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू) हे राज्यातील पशुवैद्यकीय, दुग्ध तंत्रज्ञान आणि मत्स्यविज्ञान शिक्षणाचे महत्त्वपूर्ण केंद्र आहे. सन २००० मध्ये स्थापन झालेल्या या विद्यापीठाचे मुख्यालय नागपूर येथे आहे. नागपूर, मुंबई, परभणी, उदगीर, शिरवळ आणि अकोला येथे पशुवैद्यकीय



महाविद्यालये कार्यरत आहेत. याशिवाय दुग्ध तंत्रज्ञान आणि मत्स्यविज्ञान महाविद्यालयांच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध होत आहेत. शिक्षणाबरोबरच संशोधन आणि विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून पशुपालकांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचविण्याचे काम विद्यापीठ करीत आहे.

बारावी विज्ञान शाखेनंतर विद्यार्थ्यांना पशुवैद्यकीय आणि संलग्न क्षेत्रांत विविध अभ्यासक्रम निवडता येतात. बी.व्ही.एस्सी. अँड ए.एच. हा पशुवैद्यकीय डॉक्टर होण्यासाठीचा प्रमुख अभ्यासक्रम असून त्याचा कालावधी साडेपाच वर्षांचा आहे. यामध्ये एक वर्षाच्या अनिवार्य आंतरवासितेचाही समावेश आहे. बी.एफ.एस्सी. या अभ्यासक्रमातून मत्स्यपालन, जलसंवर्धन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील संधी उपलब्ध होतात. दुग्ध तंत्रज्ञानाच्या अभ्यासक्रमातून दूध प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण आणि दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचे ज्ञान मिळते. पदव्युत्तर आणि पीएच.डी. शिक्षणातून संशोधन व अध्यापन क्षेत्रातही प्रगती करता येते. पशुवैद्यकीय पदवी प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी छएएढ-णत्रऋ आणि माफसूच्या अधिकृत प्रवेश प्रक्रियेची अद्ययावत माहिती घ्यावी.

या क्षेत्रातील पदवीधरांना शासकीय पशुसंवर्धन विभाग, पशुवैद्यकीय रुग्णालये, संशोधन संस्था, खासगी दवाखाने, औषधनिर्मिती कंपन्या, लस उत्पादन संस्था, पशुखाद्य उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमध्ये रोजगाराच्या संधी आहेत. मत्स्यविज्ञानाच्या विद्यार्थ्यांना मत्स्यपालन प्रकल्प, मत्स्यबीज उत्पादन आणि प्रक्रिया उद्योगात काम करता येते. दुग्ध तंत्रज्ञानाच्या पदवीधरांसाठी दूध प्रक्रिया प्रकल्प आणि गुणवत्ता नियंत्रण क्षेत्रात संधी उपलब्ध आहेत.

केवळ नोकरीच्या प्रतीक्षेत न राहता तरुणांनी उद्योजकतेचाही विचार करावा. आधुनिक दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, पशुखाद्य निर्मिती आणि दूध प्रक्रिया उद्योगातून स्वतःचा व्यवसाय उभारता येऊ शकतो. मात्र, त्यासाठी बाजारपेठेचा अभ्यास, भांडवल, रोगप्रतिबंध, खाद्य व्यवस्थापन आणि विपणनाचे योग्य नियोजन आवश्यक आहे.

माफसूने शिक्षणाबरोबरच संशोधन आणि विस्तार शिक्षणाला अधिक गती देणे गरजेचे आहे. आधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालये, प्रगत रोगनिदान सुविधा आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या संधी वाढविल्या पाहिजेत. ग्रामीण व दुर्गम भागांत फिरत्या पशुवैद्यकीय सेवा, पशुआरोग्य शिबिरे, लसीकरण मोहिमा आणि पशुपालक प्रशिक्षण प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. संशोधनाचा प्रत्यक्ष लाभ शेतकरी आणि पशुपालकांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे.

पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय विज्ञान हे तरुणांसाठी आश्वासक करिअर क्षेत्र आहे. या क्षेत्रात प्राण्यांप्रती करुणा, संयम, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सेवाभाव आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक संशोधन आणि उद्योजकतेला प्रोत्साहन मिळाल्यास माफसू ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते. सक्षम विद्यापीठ, कुशल तरुणाई आणि समृद्ध पशुसंवर्धन यांच्या समन्वयातून आत्मनिर्भर महाराष्ट्राच्या उभारणीला निश्चितच नवी दिशा मिळू शकते.



प्रवीण बागडे
साहित्यिक व सामाजिक विश्लेषक, नागपूर

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन न

पदापेक्षा जनतेचा विश्वास मोठा

जनतेच्या प्रेमापेक्षा मोठे पद नाही : डॉ. सुजय विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : राजकारणात पदे येतात आणि जातात; मात्र पद नसतानाही जनतेकडून मिळणारा सन्मान आणि विश्वास हीच खरी कमाई असते. जनतेच्या प्रेमापेक्षा मोठे कोणतेही पद नाही, असे प्रतिपादन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. अस्तगाव येथे ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व्यापारी संकुलाच्या लोकार्पणासह विविध विकासकामांच्या उद्घाटन व भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून अस्तगाव व परिसरातील गावांसाठी १० कोटी ४१ लाख रुपयांहून अधिक निधीच्या विकासकामांना यावेळी प्रारंभ करण्यात आला.



व्यापारी संकुलातील गाळे गरजू छोट्या व्यावसायिकांना विनामूल्य देण्याची घोषणा डॉ. विखे पाटील यांनी केली. फिटर, पंक्चर दुरुस्ती करणारे, टेलर, भांडी विक्रेते, चहावाले आणि किराणा दुकानदार अशा छोट्या व्यावसायिकांकडून पैसे घेऊन संकुल उभारण्यापेक्षा त्यांना मोफत गाळे देणे योग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. गाळ्यांचे वाटप चिठ्ठीद्वारे पारदर्शक पद्धतीने केले जाणार असून, कोणत्याही राजकीय पुढाऱ्याला किंवा पदाधिकाऱ्याला त्यावर हक्क सांगता येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. अस्तगावशी विखे पाटील कुटुंबाचे अनेक वर्षांपासून जिव्हाळ्याचे नाते आहे. आजोबा आणि वडिलांपासून या गावाशी ऋणानुबंध जोडले गेले आहेत. गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले असून, जनतेने दिलेली सत्ता सर्वसामान्यांच्या उपयोगी आली पाहिजे, असे ते म्हणाले.

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतरही जनतेने आणि कार्यकर्त्यांनी आपल्यावरील विश्वास कायम ठेवला. त्यांच्याच प्रेमामुळे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली. सरपंच, चेअरमन किंवा सभापती होण्यापेक्षा पद नसतानाही लोकांनी सन्मान देणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे पदासाठी नव्हे, तर जनतेची कामे करण्यासाठी राजकारण करावे, असा संदेश त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. अस्तगावसह मोरवाडी, तरकसवाडी आणि चोळकेवाडी परिसरातील पाणीप्रश्न, गोदावरी कालव्याची कामे, रस्ते व पथदिव्यांच्या सुविधांसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली.

महिला व मुलींची सुरक्षितता, गुन्हेगारीला आळा आणि सर्वधर्मसमभाव जपण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. पाणी, रोजगार आणि विकास या गरजांना जात-धर्माचे बंधन नसते, असे ते म्हणाले. कार्यक्रमासाठी कार्यकर्त्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे कौतुक करताना ते भावूक झाले. कार्यकर्त्यांचे निःस्वार्थ प्रेम हीच आयुष्यातील सर्वात मोठी कमाई असल्याचे सांगत गावातील मतभेद बाजूला ठेवून विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी पंचक्रोशीतील भाजपा व महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

द•ख•ल

सेवानिवृत्तीनंतर चांगल्या पुस्तकांशी मैत्री करावी : प्राचार्य शेळके



पुणतांबा : नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यानंतर उर्वरित आयुष्य आनंदाने आणि समाधानाने जगण्यासाठी चांगली पुस्तके व चांगल्या मित्रांची मैत्री करावी, असे प्रतिपादन प्राचार्य टी. ई. शेळके यांनी केले. यावेळी प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. संजय शेळके, प्रा. शिवाजीराव बारगळ आणि प्राचार्य डॉ. एस. आर. बखळे उपस्थित होते. शेळके म्हणाले की, नोकरीच्या काळात अनेक जण महत्त्वाच्या पदांवर कार्यरत असतात. त्यांच्या हाताखाली अधिकारी व कर्मचारी असतात. समाजातही त्यांची वेगळी ओळख निर्माण झालेली असते. मात्र, सेवानिवृत्तीनंतर परिस्थिती बदलते. त्यामुळे पदाचा विचार बाजूला ठेवून कुटुंबीयांसोबत आनंदाने वेळ घालवावा. चांगली पुस्तके आणि मित्र जीवनाला नवी ऊर्जा देतात. वाढत्या वयाबरोबर आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. शरीर साथ देत असेपर्यंत पर्यटन करावे. वय वाढले म्हणून नकारात्मक विचार न करता जीवनाचा पुरेपूर आनंद घ्यावा. सामाजिक कार्याची आवड असल्यास सेवाभावी व शैक्षणिक संस्थांच्या उपक्रमांत सहभागी व्हावे. त्यामुळे निवृत्तीनंतरचा वेळही सत्कारणी लागतो. यावेळी प्रा. शिवाजीराव बारगळ यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. बखळे यांनी आभार मानले.

कामगार कल्याण केंद्रात मंडळाचा वर्धापनदिन साजरा

अहिल्यानगर : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे अहिल्यानगर कामगार कल्याण केंद्रात दि. २२ नोव्हेबर २०२६ रोजी कामगार कल्याण मंडळाचा ८८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी केंद्र सभासद व कामगारांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ घेण्यात आला व शिशु मंदिर मुलांना गोड खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी वर्धापनदिनाचे आदित्य साधुन मंडळाच्या विविध योजना व उपक्रमाची माहिती देण्यात आली. सायंकाळी भजन संध्येचा कार्यक्रम घेण्यात आला. परिसरातील नागरिक व केंद्र सभासदाची उपस्थित लाभली. या कार्यक्रमासाठी केंद्र प्रमुख अनिल बोरसे, ग्रंथपाल सारीका वैद्य,केंद्रसेवक तुकाराम पुंड, योगीता वाळुंज, सविता गहिले आदिचे परिश्रम घेतले.

दैवत प्रतिष्ठानच्या वतीने हायड्रोपोनिक चारा निर्मितीच्या पायलट प्रकल्पाची उभारणी



राहुरी : दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुपालकांना वर्षभर हिरव्या चाऱ्याची उपलब्धता व्हावी आणि दुग्ध व्यवसाय आर्थिकदृष्ट्या सक्षम राहावा या उद्देशाने दैवत सामाजिक प्रतिष्ठान आणि नवनाथ दूध टाकळीमिया यांच्या संयुक्त विद्यमाने हायड्रोपोनिक चारा निर्मितीचा पायलट प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पास अहिल्यानगर जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त श्री. पाटील, जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी दशरथ दिघे, पोखरकर, टाकळीमियाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. वैभव वाकडे यांनी भेट देऊन प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी अधिकाऱ्यांनी प्रकल्पाची कार्यपद्धती, चारा निर्मितीचे तंत्रज्ञान, त्याचा पशुपोषणासाठी होणारा उपयोग आणि ग्रामीण भागातील पशुपालकांना मिळणारे फायदे यांची सविस्तर माहिती घेतली. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपायुक्त पाटील यांनी दैवत सामाजिक प्रतिष्ठानने दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पशुपालकांसाठी सुरू केलेल्या या उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले. या प्रकल्पाच्या माध्यमातून अधिकाधिक पशुपालकांपर्यंत हायड्रोपोनिक चारा निर्मिती तंत्रज्ञान पोहोचविण्यासाठी आणि प्रकल्पाचा विस्तार करण्यासाठी शासनाच्या माध्यमातून शक्य ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासित केले. या भेटी दरम्यान अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध महत्त्वपूर्ण सूचना व मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे भविष्यात हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यास निश्चितच मदत होणार आहे. यावेळी लताताई शिंदे, सतीश शिंदे, दैवतम प्रतिनिधी, दैवत दीदी, एकादशी ग्रोचे संचालक श्रेयस शिंदे, निमेटाचे रिजनल मॅनेजर म्हस्के, दैवत उद्योग समूहाचे व्यवस्थापक अशोक खरात तसेच नवनाथ दूध व दैवत सामाजिक प्रतिष्ठानचे पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. दुष्काळावर मात, पशुधनाचे संरक्षण आणि पशुपालकांचे आर्थिक सक्षमीकरण या उद्देशाने दैवत सामाजिक प्रतिष्ठान व नवनाथ दूध यांचा हा संयुक्त उपक्रम ग्रामीण दुग्ध व्यवसायासाठी एक महत्त्वपूर्ण आणि दिशादर्शक पाऊल ठरणार आहे.

सुजयदादा विखे पाटील यांचा लाडक्या बहिणींच्या वतीने गौरव



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदी भाजपचे राज्य उपाध्यक्ष माजी खासदार सुजयदादा विखे पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा भाजप शिवसेना महिला पदाधिकारी असलेल्या लाडक्या बहिणींच्या वतीने त्यांना त्यांच्या कामात उतुंग भरारी घेण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.सत्कार प्रसंगी वीस फूट आकाराचा गुलाबांसह सुगंधी फुलांचा हार सुजय दादांना घालण्यात आला.

सत्कार प्रसंगी महिला बचत गट मार्गदर्शक आमदार सौभाग्यवती सौ.रत्नाताई विठ्ठलराव लंघे पाटील,भाजप वैद्यकीय आघाडीच्या राज्य उपाध्यक्षा नगरसेविका व स्त्री रोग तज्ञ डॉ. मनिषाताई वाघ, डॉ. निर्मला सांगळे, भाजपच्या तालुका महिला आघाडीच्या अध्यक्षा मंगलताई काळे पाटील, भारतीताई बेद्रे, शिवसेना महिला आघाडीच्या प्रमुख शोभाताई आलवणे, अहिल्याताई लंघे, रंजनाताई पोटे, भाजप महिला मोर्चा शहराध्यक्ष नीता कडू यांच्यासह महिला बचत गटाच्या प्रमुख महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

सुजय विखे पाटील हे जिल्हा बँकेचे चेअरमनपदी विराजमान झाल्यामुळे ते महिला बचत गटाच्या उत्कर्षासाठी नक्कीच चांगल्या प्रकारचा निर्णय घेतील व त्यादृष्टीने विविध योजना देखील राबवतील.तसेच लाडक्या बहिणींच्या उत्कर्षासाठी लवकरच निर्णय घेतले असा विश्वास महिला पदाधिकाऱ्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला.

वाकडीत बिबट्याचा धुमाकूळ, सहा शेळ्या ठार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वाकडी : राहाता तालुक्यातील वाकडी येथे बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शेतकरी दिगंबर नानासाहेब जाधव यांच्या सहा शेळ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी दिगंबर जाधव यांच्या शेळ्यांवर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात बीटल जातीच्या शेळ्या, बोकड तसेच गावरान शेळ्यांचा समावेश असलेल्या एकूण सहा शेळ्यांचा मृत्यू झाला. या घटनेत जाधव यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकारी सौ. सविता थोरात यांनी घटनास्थळी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसेच मृत शेळ्यांचा पंचनामा करण्यात आला आहे.

आधीच दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत असताना बिबट्याच्या हल्ल्यात सहा शेळ्या दगावल्याने जाधव कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे. शेळीपालन हा उत्पन्नाचा आधार असलेल्या शेतकऱ्याचे या घटनेमुळे मोठे नुकसान झाले आहे. वनविभागाने या घटनेची तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासन नियमानुसार आर्थिक मदत व नुकसानभरपाई मिळवून द्यावी, तसेच परिसरातील बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकरी वर्गातून होत आहे.

नेवासा तहसील कार्यालयात अस्वच्छतेचा कळस

मुतारीत दुर्गंधी, भिंतींवर गुटख्याचे डाग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : तहसील कार्यालयातील स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, कार्यालयातील मुतारीत पसरलेली दुर्गंधी आणि परिसरातील भिंतींवर जागोजागी दिसणारे गुटख्याच्या पिचकाऱ्यांचे डाग यामुळे अस्वच्छतेचे चित्र समोर आले आहे.

या प्रकाराची सामाजिक कार्यकर्ते प्रल्हाद शिंदे पाटील यांनी पाहणी करून कार्यालयातील स्वच्छतेच्या परिस्थितीकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

तहसील कार्यालयात दररोज विविध कामांसाठी तालुक्यातील नागरिक, शेतकरी, महिला आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने येत असतात. मात्र, कार्यालयातील मुतारीची अस्वच्छ अवस्था आणि दुर्गंधीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तसेच कार्यालयाच्या कोपऱ्यांतील भिंती गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी रंगलेल्या दिसत असून, सार्वजनिक स्वच्छतेबाबत प्रशासनाची उदासीनता दिसून येत आहे.

शासकीय कार्यालयात गुटखा व तंबाखू सेवनासंबंधी नियमांचे पालन होणे अपेक्षित असताना, कार्यालयातील काही कर्मचारी गुटखा खात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे कार्यालय परिसरात गुटखा खाणे व थुंकणे यावर प्रशासनाचा वचक आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.

यासंदर्भात प्रल्हाद शिंदे पाटील यांनी तहसील कार्यालयातील अस्वच्छतेचा मुद्दा उपस्थित केला असून, तहसीलदारांनी या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन मुतारीची नियमित स्वच्छता, भिंतींची साफसफाई तसेच कार्यालय परिसरात गुटखा खाणाऱ्या व थुंकणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

तहसील कार्यालयातील अस्वच्छतेला आळा घालण्यासाठी तहसीलदार आता कोणती ठोस भूमिका घेणार? संबंधितांवर कारवाई होणार का? याकडे नागरिकांसह सर्वांचे लक्ष लागले आहे.

गुंजाळवाडी ग्रामपंचायत उपसरपंच निवडीला अप्पर जिल्हाधिकार्यांची स्थगिती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : संगमनेर तालुक्यातील गुंजाळवाडी ग्रामपंचायतचे उपसरपंच भाऊसाहेब रखमा गुंजाळ यांनी उपसरपंच पदाचा राजीनामा दिलेला नसताना आपल्या मनावर सहीचे राजीनामा पत्र तयार करून सरपंच अमोल गुंजाळ यांनी ते मासिक सभेत मंजूर केला असल्याचा दावा उपसरपंचांनी केला आहे . तसेच ग्रामपंचायतच्या कामकाजात आपल्याला सन्मान पूर्वक वागणूक मिळत नसल्याची तक्रार उपसरपंच गुंजाळ यांनी संगमनेरचे गटविकास अधिकारी व शिर्डीचे अप्पर जिल्हा अधिकारी यांच्याकडे केली त्या तक्रारीनुसार अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन उपसरपंच निवड प्रक्रियेला स्थगिती दिली असल्याने आता हा उपसरपंच पदाचा वा चांगलाच गाजण्याची शक्यता आहे गुंजाळवाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच निवडीसाठी ५ नोव्हेंबर २०२६ रोजी सभा आयोजित केली होती. मात्र, या निवड प्रक्रियेच्या वैधतेबाबत भाऊसाहेब गुंजाळ यांनी संबंधित गटविकास अधिकारी आणि शिर्डीचे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारी च्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी निवड प्रक्रियेला स्थगिती दिल्याने नियोजित निवड प्रक्रिया थांबविण्यात आली आहे .त्यामुळे या राजीनामा प्रकरणाची सत्यता, राजीनामा मंजूर करण्याची प्रक्रिया आणि पुढील प्रशासकीय कार्यवाही याबाबत आता उत्सुकता निर्माण झाली आहे. या प्रकरणात संबंधित कागदपत्रांची पडताळणी करून वस्तुस्थिती स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, ग्रामपंचायतीतील या वादाच्या पार्श्वभूमीवर गावातील घनकचरा व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते, नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि दलित वस्ती सुधारणा यांसारख्या विषयांवर अपेक्षित प्रगती होत आहे का, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.शासनाच्या विविध योजनां मधून ग्रामपंचायतीला उपलब्ध होणारा निधी कोणत्या कामांसाठी आणि किती प्रमाणात खर्च केला जात आहे, विकासकामांची सद्य स्थिती काय आहे, तसेच संबंधित कामांचा दर्जा व प्रगती याबाबत पारदर्शक माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे. गुंजाळ वाडी गावातील काही राजकीय पक्षाचे पुढारी हे उपसरपंच गुंजाळ यांच्यावरती राजीनाम्यासाठी दाबाव तंत्र आणत ग्रामस्थांमध्ये चर्चा होत आहे. तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्यामधील मतभेदांमुळे गावाच्या विकासकामांवर परिणाम होऊ नये, अशी अपेक्षा ही नागरिक व्यक्त करीत आहेत. गावातील मूलभूत प्रश्न सोडविणे, शासकीय योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविणे आणि विकासकामांसाठी उपलब्ध निधीचा नियमानुसार विनियोग करणे ही ग्रामपंचायतीची प्रमुख जबाबदारी आहे. त्यामुळे उपसरपंच पदाच्या वादावर तोडगा काढून या ग्राम पंचायतीचा कारभार सुरळीत करण्याची गरज व्यक्त होत आहे. आता राजीनामा पत्राची सत्यता कशी तपासली जाते, ग्रामपंचायतीच्या सभेतील ठराव आणि संबंधित कागदपत्रांची पडताळणी कशी होते, तसेच उपसरपंच पदाबाबत पुढील निर्णय काय घेतला जातो, याकडे गुंजाळवाडी ग्रामस्थांचे लक्ष लागून आहे

प्रवरा औषधनिर्माण महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींना 'वेन्यान' शिष्यवृत्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





लोणी : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा ग्रामीण औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींना प्रतिष्ठेची 'वेन्यान' शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. फार्मास्युटिक्स विभागातील तृप्ती सोमवंशी आणि पूजा पवार यांनी हे यश संपादन केले. महाविद्यालयातील विविध विभागांतील १२ विद्यार्थिनींची या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली होती. त्यापैकी तृप्ती सोमवंशी आणि पूजा पवार यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. या विद्यार्थिनींना डॉ. सुहास सिद्धेश्वर यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मंगाथायारू के. यांनी ही माहिती दिली. 'वेन्यान' ही महाराष्ट्रातील विद्यार्थिनींना विज्ञान, संशोधन आणि उद्योजकता क्षेत्रात प्रोत्साहन देणारी शिष्यवृत्ती योजना आहे. पुणे कॉलेज क्लस्टर (पीकेसी) आणि बीएएसएफ केमिकल्स इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ही योजना राबविण्यात येते. निवड झालेल्या विद्यार्थिनींना सहा महिन्यांसाठी दरमहा १५ हजार रुपये, याप्रमाणे प्रत्येकी एकूण ९० हजार रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे. या यशाबद्दल सर्वांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

जाहीर निविदा

घारी ग्रामपंचायत तालुका कोपरगाव - बी १ निविदा

ग्रामपंचायत घारी, ता.कोपरगाव, जि. अहिल्यानगर येथील कामाचे सन २०२६/२७ साठी नोंदणीकृत, ठेकेदार, पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

अ. क्र.	योजनेचे नाव	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा रक्कम	कामाचा कालावधी	निविदा फॉर्म फी	ठेकेदाराचा प्रवर्ग
१	पंधरावा वित्त आयोग व स्वच्छ भारत मिशन	मौजे घारी येथे सार्वजनिक शौचालय बांधणे ता. कोपरगाव	०३ लक्ष	२५४२३७	६ महिने	३००	सु.बे

अटी व शर्ती

१) निविदा फार्म माहितीपत्रक दि .२३/११/२०२६ ते ३०/११/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील.

२)बी १ निविदा दि.१/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० उघडण्यात येईल.

३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
घारी, ग्रामपंचायत ता. कोपरगाव

साई संस्थानला विश्वस्त मंडळ नसल्याने शिर्डीचा विकास खुंटला : सतीश गंगवाल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : शिर्डीतील व्यापारी व प्रतिष्ठित उद्योजक, साई अरिहंत नागरी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन सतीश श्यामलालजी गंगवाल यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक राष्ट्रसह्याद्रीच्या वतीने त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी दैनिक राष्ट्र सह्याद्री टीमने त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या भेटीदरम्यान शिर्डीच्या विविधांगी विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी शिर्डीच्या जडणघडनी बाबत त्यांनी मोठे भाष्य केले.शिर्डी शहर आता बदलतंय, पूर्वीसारखी शिर्डी राहिली नाही, अशी खंत यावेळी सतीश गंगवाल यांनी व्यक्त केली. शिर्डीमध्ये भाविकांची गर्दी होण्याचे प्रमाण कमी झाले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.यावर काय उपाययोजना करता येतील, असा प्रश्न त्यांना विचारला असता त्यांनी ठाम भूमिका मांडली. जोपर्यंत साईबाबा संस्थानवर पूर्ण विश्वस्त मंडळ येत नाही, तोपर्यंत शिर्डीचा विकास होऊ शकत नाही त्यामुळे त्याचा गर्दी वर परिणाम होते आहे .सध्याचे त्रिसदस्यीय मंडळ हे ठोस निर्णय घेण्यास अपयशी ठरत



आहे. त्यांना न्यायालयाच्या काही मर्यादा आहेत.

त्यामुळे शिर्डीचा विकास हा खुंटलेला आहे, असेही गंगवाल यांनी स्पष्ट केले.नवीन विश्वस्त मंडळ जर आले तर ते ठोस निर्णय घेतील. शिर्डीत भाविकांची संख्या कशी वाढेल, शिर्डीमध्ये भाविक कसे थांबतील, याविषयी ते ठोस निर्णय घेतील. त्यामुळे शिर्डीच्या अर्थकारणाला मोठी मदत होईल, अशी ठाम भूमिका सतीश गंगवाल यांनी यावेळी मांडली . या भेटीत शिर्डीच्या विकास, भाविकांची घटती संख्या आणि संस्थानच्या कारभारावर त्यांनी मनमोकळेपणाने आपले मत व्यक्त केले.

श्रीरामपुर येथील
न्यायदंडाधिकारी वर्ग, १
कोर्ट नं. १
ने. ता.०५/०१/२०२७
अॅड, रमाकांत जी. राठोड
मो नं. ९८९०५४६८६०
दि. २०/११/२०२६

जाहिर नोटीस

श्रीरामपूर येथील मे. ज्युडी. मॅजी. साहेब वर्ग १ यांचे कोर्टात..

क्रि. चौ. अ. नं. ६२८/२०२६

श्री. शिवाजी खंडेराव मुठे-अर्जदार

विरुध्द

मा. निबंधक साहेब, तथा ग्रामपंचायत अधिकारी साहेब, मुठेवाडगाव,-सा. वाले

ज्याअर्थी श्रीरामपुर न्यायालयात अर्जदाराने क्रि.चौ.अर्ज नं. ६२८/२०२६ अर्ज जन्म मृत्यु कायदा १९६९ चा कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांनी त्यांचे वडिल नामे खंडेराव प्रल्हाद मुठे यांचा मृत्यु दि. १६/०७/२००५ रोजी मौजे मुठेवाडगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथे घरीच झालेला आहे. अशी आशयाची मृत्युची नोंद होऊन तसा दाखला मिळवण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर सा. वाले यांनी म्हणणे देणेकरीता नोटीस मिळालेपासुन दि. ०४/०१/२७ रोजी पर्यंत स्वतः किंवा वकिलामार्फत हजर होवुन हरकती नोंद करावयात व योग्य मुदतीत कोणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे मागणी प्रमाणे त्वरीत पुरावा घेवुन अर्जदाराचे वडिल नामे खंडेराव प्रल्हाद मुठे यांचे मृत्युचे तारखेचा नोंदीचा हक्क सिध्द झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराच्या हक्कात आदेश करील.

श्रीरामपुर
ता. २०/११/२०२६

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर व
फौजदारी न्यायालय वर्ग १, श्रीरामपुर

श्रीरामपुर येथील
न्यायदंडाधिकारी वर्ग १
कोर्ट नं. २
ने. ता. ०१/०१/२०२७
अॅड. के. एस. भगत
मो नं. ९९६०५००६१३
दि. २०/११/२०२६

जाहिर नोटीस

श्रीरामपूर येथील मे. ज्युडी, मॅजी, साहेब, वर्ग १ यांचे कोर्टात.....

क्रि. चौ. अ. नं. ६२९/२०२६

सौ. उमा संजय शिंदे-अर्जदार

विरुध्द

मा. निबंधक साहेब, जन्म-मृत्यु नोंदणी विभाग ग्रामपंचायत खिर्डी-सा.वाले

ज्याअर्थी श्रीरामपुर न्यायालयात अर्जदाराने क्रि.चौ. अर्ज नं. ६२९/२०२६ अर्ज जन्म मृत्यु कायदा १९६९ चा कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांनी त्यांचा जन्म दि. २६/१२/१९६८ रोजी मौजे खिर्डी, ता. श्रीरामपूर, जि. अ. नगर येथे झालेला आहे. अशी आशयाची जन्माची नोंद होऊन तसा दाखला मिळवण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर सा. वाले यांनी म्हणणे देणेकरीता नोटीस मिळालेपासुन दि. ०१/०१/२०२७ रोजी पर्यंत स्वतः किंवा वकिलामार्फत हजर होवुन हरकती नोंद करावयात व योग्य मुदतीत कोणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे मागणी प्रमाणे त्वरीत पुरावा घेवुन अर्जदार यांचे जन्माच्या तारखेचा नोंदीचा हक्क सिध्द झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराच्या हक्कात आदेश करील.

श्रीरामपुर
ता.२०/११/२०२६

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर व
फौजदारी न्यायालय वर्ग १, श्रीरामपुर

जाहिर नोटीस

अॅड. ए.पी. उंबरकर
ने.ता. २४/१२/२०२६

मा. न्यायिक दंडाधिकारी (प्रथम वर्ग), राहाता

मा. न्यायिक दंडाधिकारी (प्रथम वर्ग), राहाता यांच्या न्यायालयात

क्रि.एम.ए.नं. ४३२/२०२६

आकाश दीपक खावडीया, वयः २६ वर्ष, व्यवसायः मजुरी पत्ताः विठ्ठल नगर, बिरोबा मंदिराजवळ, लोणी बु. ता. राहाता, जि. अहिल्यानगर.-अर्जदार

विरुध्द

जन्म-मृत्यू निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी /ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, लोणी बु, ता. राहाता, जि. अहिल्यानगर,-सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार हा वरील नमूद पत्त्यावर राहणारा असून भारताचा नागरिक आहे. अर्जदाराचा जन्म दिनांक २२/०७/२००० रोजी मौजे लोणी बु, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथील मूळ निवासस्थानी झाला आहे. अर्जदाराच्या जन्माच्या वेळी तत्कालीन कौटुंबिक परिस्थिती, अज्ञान व निरक्षरतेमुळे पालकांकडून अर्जदाराच्या जन्माची रीतसर नोंद ग्रामपंचायत कार्यालय, लोणी बु येथील जन्म-मृत्यू नोंदवहीत वेळेत केली गेली नाही. अर्जदारास शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी व वैयक्तिक कामासाठी अधिकृत जन्म प्रमाणपत्राची नितांत आवश्यकता भासल्याने, अर्जदाराने ग्रामपंचायत कार्यालय, लोणी बु येथे जाऊन जुन्या जन्म नोंदवहीत स्वतःच्या नावाची व जन्मतारखेची खात्री केली. परंतु, सदर नोंद उपलब्ध नसल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून अर्जदाराने रितसर मागणी केली असता, सामनेवाला ग्रामपंचायत कार्यालयाकडून 'जन्म नोंद उपलब्ध नसल्याचे प्रमाणपत्र' (Non-Availability Certificate) अर्जदारास देण्यात आले आहे.

अर्जदाराच्या वयाचा व जन्मतारखेचा पुरावा म्हणून अर्जदाराकडे आधार कार्ड उपलब्ध असून त्या वर अर्जदाराची जन्मतारीख २२/०७/२००० अशीच नमूद आहे. अर्जदाराने जन्माची नोंद न करण्यात कोणताही गैरहेतू ठेवलेला नव्हता. केवळ वेळेत माहिती न दिल्यामुळे ही नोंद राहून गेली आहे. त्यामुळे जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ च्या कलम १३(३) मधील कायदेशीर तरतुदींनुसार न्यायालयाच्या आदेशाशिवाय अशी विलंबित नोंद करण्यासाठी सदर नोटीस देत आहे.

त्याअर्थी, अर्जदाराचा जन्म दिनांक २२/०७/२००० रोजी मौजे लोणी बु, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे झाला असल्याबाबत जन्माची विलंबित नोंद करण्याचे बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अगर त्यात कोणाचा हितसंबंध असल्यास त्यांनी न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग राहाता यांचे समक्ष दि. २४/१२/२०२६, रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः जातीने अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे अन्यथा पुढील हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/११ /२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले असे.

तयार करणार
वरिष्ठ लिपीक

हुकुमावरून
अधिक्षक
मा. न्यायिक दंडाधिकारी (प्रथम

रोहित पठारे हत्याकांड : न्यायासाठी आंबेडकरी समाजाचा रास्ता रोकोचा प्रयत्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : रोहित अनिल पठारे हत्याकांडातील पीडित कुटुंबाला न्याय मिळावा आणि निवेदनातील प्रमुख मागण्यांची अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी रविवारी (ता. २२) आंबेडकरी समाज बांधवांनी समृद्धी महामार्गावरील जांबरगाव इंटरचेंज येथे रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार सकाळी दहाच्या सुमारास आंदोलक गंगापूर महामार्गावरून जांबरगाव इंटरचेंच्या दिशेने निघाले. मात्र, इंटरचेंजपासून सुमारे पाचशे मीटर आधीच पोलिसांनी त्यांना अडविले. त्यामुळे आंदोलकांनी रस्त्यावरच ठिय्या मांडत आपल्या मागण्यांबाबत प्रशासनाला जाब विचारला. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीनंतर आणि काही मागण्यांबाबत ठोस आश्वासन





मिळाल्यानंतर आंदोलकांनी संयमाची भूमिका घेतली.

रोहित पठारे हत्याकांडाचा तपास विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) करावा, पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, रोहितच्या पत्नीला सरकारी नोकरी द्यावी, खटला जलदगती न्यायालयात चालवावा, तसेच संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशा नऊ प्रमुख मागण्यांचे निवेदन ९ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री महोदयांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्यात आले होते. या मागण्यांच्या पूर्ततेसाठी २२ नोव्हेंबर रोजी समृद्धी महामार्गावर रास्ता रोको करण्याचा इशारा देण्यात आला होता.

रविवारी सकाळपासूनच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलक जांबरगाव इंटरचेंजच्या दिशेने येत असताना पोलिसांनी त्यांना पुढे जाण्यास मज्जाव केला. यावेळी आंदोलकांनी रस्त्यावरच ठिय्या देत मागण्यांची पूर्तता का होत नाही, असा सवाल उपस्थित केला. आंदोलनस्थळी अप्पर जिल्हाधिकारी जनार्दन विधाते, आमदार रमेश बोरणारे आणि नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी दाखल झाले. त्यांनी आंदोलकांशी चर्चा करून परिस्थिती शांत करण्याचा प्रयत्न केला. हत्येचा गुन्हा सीआयडीकडे वर्ग करण्यात आला असून, गुन्ह्यात आवश्यक कलमांची वाढ करण्याबाबत तसेच पीडित कुटुंबातील सदस्याला लवकरात लवकर शासकीय नोकरी देण्याबाबत ठोस आश्वासन देण्यात आले. त्यामुळे आंदोलकांनी पुढील भूमिका घेताना संयम दाखविला.

दरम्यान, गंगापूर रस्त्यावर आंदोलक ठिय्या देऊन बसलेले असतानाही काही आंदोलक आणि पीडित कुटुंबीयांनी पोलिसांचा बंदोबस्त चुकवत समृद्धी महामार्ग गाठला. तेथे रोहितला न्याय मिळावा, अशा घोषणा देत आंदोलन सुरू केले. मात्र, काही मिनिटांतच पोलिसांनी या आंदोलकांना ताब्यात घेत महामार्गावरील वाहतूक पूर्ववत केली. दिवसभराच्या या घडामोडींमुळे रोहित पठारे हत्याकांडाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होते, याकडे पीडित कुटुंबीयांसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

शेतकऱ्यांच्या दारात वसुलीला गेलात तर याद राखा!

असून मुख्यमंत्र्यांचा आदेश उधळून लावत आहेत. त्यामुळे सरकारचा प्रशासनावर धाक आहे की नाही, असा प्रश्न निर्माण होतो. यापुढे बँका किंवा फायनान्स कंपन्यांचे अधिकारी वसुली अथवा जप्तीसाठी शेतकऱ्यांच्या घरी गेले, तर राष्ट्रवादी काँग्रेस त्यांना त्याच पद्धतीने उत्तर देईल, असा इशारा शिंदे यांनी दिला.

राज्य सरकारने नुकसानभरपाई देण्यात चालढकल करू नये. राज्य सरकार केंद्राकडे मदतीची मागणी करत असले तरी अद्याप अपेक्षित मदत मिळालेली नाही. महाराष्ट्राचे केंद्र सरकारमध्ये वजन आहे की नाही, अशी शंका निर्माण होत असल्याचेही ते म्हणाले. विदर्भ आणि मराठवाड्यात शेतकरी आत्महत्या करत असताना सरकारला परिस्थितीचे गांभीर्य नसल्याचा आरोप त्यांनी केला. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सूचनेनुसार राष्ट्रवादीचे पदाधिकारी राज्यभर दौरे करत असून, या दौऱ्यानंतर बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर पक्षाची पुढील भूमिका निश्चित केली जाईल, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.

सत्ता तुमची, सरकार तुमचे; मग ऊसदरासाठी शेतकरी रस्त्यावर का?

अहिल्यानगर जिल्ह्यात २०२६-२७ च्या गळीत हंगामातील ऊसदराचा प्रश्न चांगलाच तापला आहे. जिल्ह्यातील काही साखर कारखान्यांनी प्रतिटन ३,१०० ते ३,२०० रुपयांची पहिली उचल जाहीर केली आहे. मात्र, या दरावर ऊस उत्पादक शेतकरी समाधानी नसून प्रतिटन ४,५०० रुपये पहिली उचल मिळावी, अशी त्यांची मागणी आहे. दुसरीकडे काही जिल्ह्यांत ४,००० ते ४,२०० रुपयांपर्यंत दर जाहीर होत असल्याची चर्चा असल्याने अहिल्यानगरमधील शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे.

या प्रश्नावर विविध शेतकरी संघटना, सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांचे पदाधिकारी आंदोलनाच्या भूमिकेत उतरले आहेत. भाजप आणि शिवसेनेचे सत्ताधारी पदाधिकारीही शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरत आहेत. त्यांच्या भूमिकेचे स्वागतच आहे. मात्र, राज्यात सत्ता तुमची आणि सरकारही तुमचे असताना शेतकऱ्यांना दरवाढीसाठी आंदोलन का करावे लागत आहे, हा खरा प्रश्न आहे. सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी आंदोलन करण्याबरोबरच सरकारच्या पातळीवर दरवाढीसाठी ठोस निर्णय घडवून आणण्याची जबाबदारीही पार पाडली पाहिजे.

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून या प्रश्नावर विशेष लक्ष देण्याची अपेक्षा आहे. त्यांनी कारखानदार, साखर आयुक्तालयाचे अधिकारी, जिल्हाधिकारी आणि शेतकरी प्रतिनिधींची संयुक्त बैठक बोलावून ऊसदराचा प्रश्न मार्गी लावावा. शेतकऱ्यांची ४,५०० रुपयांची मागणी, कारखान्यांची आर्थिक परिस्थिती आणि इतर जिल्ह्यांतील दर यांचा विचार करून समन्वयातून मार्ग काढण्याची गरज आहे.

अलीकडे नेवासा येथे झालेल्या फराळाच्या कार्यक्रमात जिल्ह्यातील राजकीय पदाधिकारी उपस्थित होते. मात्र, अशा कार्यक्रमांच्या व्यासपीठावर शेतकऱ्यांच्या ऊसदराचा प्रश्न ठामपणे मांडला गेला का, हा प्रश्न उपस्थित होतो. राजकीय भेटीगाठी आणि स्नेहमेळाव्यांबरोबरच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरही चर्चा होणे आवश्यक आहे.

काँग्रेससह विरोधी पक्षातील नेत्यांनीही ऊसदराच्या प्रश्नावर सक्रिय भूमिका घ्यावी. माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह सहकार क्षेत्रातील अनुभवी नेत्यांनी आपल्या राजकीय प्रभावाचा उपयोग शेतकऱ्यांना रास्त दर मिळवून देण्यासाठी करावा. हा प्रश्न कोणत्याही एका पक्षाचा नसून शेतकऱ्यांच्या जगण्याचा आहे.

केवळ निवेदने, मोर्चे, भाषणे आणि प्रसिद्धीपुरते आंदोलन मर्यादित राहू नये. एफआरपीची रक्कम वेळेत मिळणे, वजनकाट्यांमध्ये पारदर्शकता, ऊसतोडणी व वाहतूक कपातीचा स्पष्ट हिशेब आणि पहिल्या उचलीच्या दराबाबत ठोस निर्णय होणे गरजेचे आहे. कारखानदारांनीही आर्थिक परिस्थितीचा पारदर्शक हिशेब मांडावा.

सत्ताधारी पक्षाने सरकारच्या माध्यमातून निर्णय घडवून आणावेत, तर विरोधकांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी प्रभावी पाठपुरावा करावा. शेतकऱ्याला राजकीय सहानुभूती नको, तर त्याच्या कष्टाचा रास्त मोबदला हवा आहे. पहिली उचल ३,१०० ते ३,२०० रुपये जाहीर झाली; मात्र ४,५०० रुपयांच्या मागणीचे काय, याचे उत्तर संबंधितांनी दिले पाहिजे.

आंदोलनाची प्रसिद्धी नको, शेतकऱ्यांच्या खात्यात न्यायाचा मोबदला हवा! सत्ता असो वा विरोधक, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आता भाषणांपेक्षा ठोस निर्णय आणि अंमलबजावणी दिसली पाहिजे.



नरेंद्र पाटील काळे
प्रदेश उपाध्यक्ष, भारतीय किसान युनियन,
महाराष्ट्र राज्य, नेवासा

ग्रो इन्व्हेस्टर कंपनी फसवणूक प्रकरण,

आरोपींची माहिती देणाऱ्यास २५ हजारांचे बक्षीस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या ग्रो इन्व्हेस्टर कंपनी प्रकरणातील दोन फरार आरोपींची माहिती देणाऱ्यास २५ हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन यांनी हे बक्षीस जाहीर केले असून, माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासह परिसरातील जिल्ह्यांमध्ये अल्पावधीत मोठा परतावा देण्याचे आमिष दाखवून ग्रो इन्व्हेस्टर कंपनीकडून नागरिकांकडून मोठ्या रकमा स्वीकारल्या जात असल्याची गोपनीय माहिती अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी कोणत्याही तक्रारीची वाट न पाहता उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक तयार करून कारवाईचे आदेश दिले. या पथकाने





२६ डिसेंबर २०२५ रोजी श्रीरामपूर तालुक्यातील भोकर शिवारातील हनुमानवाडी येथे छापा टाकला. यावेळी संदीपराज मोहिनीराज कपाटे याच्या निवासस्थानी झडती घेतली असता नऊ पासबुक, दहा धनादेश पुस्तिका, हिशोबाची वही, ॲपल कंपनीचा संगणक, तीन संगणक पडदे, दोन पेनड्राइव्ह, रोकड मोजण्याचे यंत्र, दोन तिजोऱ्या, तीन वॉकीटॉकी, एचएचएमडी आणि एक लाख चार हजार सहाशे रुपये रोख असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस निरीक्षक अरुण धनवडे यांनी फिर्याद दिल्यानंतर श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर कायदेशीर कारवाईच्या भीतीने आरोपींकडून काही ठेवीदारांचे पैसे परत करण्यात आले; मात्र अद्याप काही ठेवीदारांच्या ठेवी परत मिळालेल्या नाहीत.

आत्मविश्वास अन् सदैव प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास यश निश्चित : विठ्ठल माने

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

माळवाडगांव : विद्यार्थ्यांनी क्रिडा, अन् शैक्षणिक क्षेत्रात आत्मविश्वास अन् सदैव प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास यश मिळते असे प्रतिपादन श्रीरामपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता विठ्ठल माने यांनी माळवाडगांव येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

टाकळीभानचे सुपुत्र शिवम अनिल पटारे या कबड्डीपटूने नुकत्याच अहमदाबाद येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय कॉमनवेल्थ चॅम्पियन कबड्डी स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत यश मिळवले.याबद्दल माळवाडगांव येथील खा.गोविंदरांव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल विद्या.लयात माजी विद्यार्थी संघटनेचे व विद्यालयाचे वतीने शिवम पटारे यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार भाऊसाहेब काळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीरामपूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता विठ्ठलराव माने हे होते.आपल्या प्रमुख भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माने पुढे म्हणाले की शुभम पटारे या विद्यार्थ्याने प्रारंभीपासूनच अभ्यासक्रमा बरोबरच खेळाकडेही आपले लक्ष केंद्रित केले.आतापर्यंत त्याने कबड्डी मध्ये तालुका जिल्हा पातळीपासून राज्य देश पातळीवर सहभाग घेतला आहे. अनेक मेडल मिळाल्यानंतर त्याने कॉमनवेल्थ चॅम्पियन शिपमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करत भारताला कबड्डी कॉमनवेल्थचे मेडल मिळवून दिले. शिवमचा हा प्रवास अलिकडचा नसुन त्यास एक दशकांपासून या कबड्डी क्रिडा क्षेत्रात परिश्रम घ्यावे लागले आहे. माने यांनी आपल्या विद्यार्थी काळातील अभियंता होण्याचे जिद्द अन् प्रसंग समोर मांडले.

विद्यार्थ्यानी क्रिडा,व शैक्षणिक क्षेत्रात आत्मविश्वास अन् सदैव प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास यश दुर नसल्याचे शेवटी विठ्ठलराव माने यांनी सांगितले. माजी विद्यार्थी संघटना, विद्यालयाचे व ग्रामस्थांचे वतीने शिवम यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सरपंच मीना मोरे, न्यू इंग्लिश माळवाडगाव माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्रीकांत दळे, सुरेश आसने,निलेश आसने, योगेश ना. आसने,रवींद्र ना. आसने, पत्रकार संदिप आसने, भवानी देवी ट्रस्ट विश्वस्त बाळासाहेब हुरुळे, भास्कर आसने, ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब आसने, सोसायटीचे व्हा चेअरमन शंकरराव आसने, केशव आसने ,विजय आसने अनिल आसने,,माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष योगेश सोपान आसने ,शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सुनील आसने ,बापू अनुसे, राहुल कावरे ,प्रसाद कावरे ,ऋषिकेश चौधरी शिक्षक सोपानराव उंडे, पंडित सर ,देवडकर सर, मनीषा थोरात ,प्राजक्ता वाबळे ,शेळके ,गौरव भांड ,सेवक चौधरी मामा,जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक मंतोडे याप्रसंगी प्रास्ताविक सोपान उंडे, तर आभार सुरेश आसने यांनी मानले.

प्रा.स्वाती कांबळे यांना पुणे विद्यापीठातून इंग्रजी विषयात पीएचडी. प्रदान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

भोकर : श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील कन्या आणि राहुरी येथील लोकनेते रामदासपाटील धुमाळ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील उच्च माध्यमिक विभागाच्या इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका सौ. स्वाती रावसाहेब कांबळे (शिंदे) यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून इंग्रजी विषयात पीएच.डी.(विद्यावाचस्पती) ही सर्वोच्च पदवी प्रदान करण्यात आली असल्याने या यशामुळे आता त्या डॉ. स्वाती कांबळे-शिंदे म्हणून ओळख निर्माण झाली आहे.

त्यांनी आर. के. नारायण यांच्या निवडक कादंबऱ्यांतील संवादाचे बारकावे - एक समाजभाषाशास्त्रीय अभ्यास या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता. या संशोधनासाठी त्यांना सोनई महाविद्यालयाचे प्रा.डॉ.मच्छींद्र वर्पे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राथमिक शिक्षण भोकर परिसरातील हनुमानवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत घेतले, माध्यमिक शिक्षण भोकर येथील जगदंबा प्रासादिक विद्यालयात, तर उच्च माध्यमिक शिक्षण श्रीरामपूर येथील रावबहादूर नारायणराव बोरावके महाविद्यालय येथे पूर्ण केले. तसेच त्यांनी श्रीरामपूर येथील स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन येथून बी.एड.पदवी संपादन केली. ग्रामीण भागातून शिक्षण घेत त्यांनी जिद्द व चिकाटीच्या जोरावर हे उच्च यश संपादन केले आहे.

त्या भोकर येथील रहीवाशी व शेतकरी असलेले एस.टी. महामंडळाचे सेवानिवृत्त नियंत्रक रावसाहेब कांबळे यांच्या कन्या असून, येथील जेष्ठ सामाजीक कार्यकर्ते कै.भाऊसाहेब कांबळे, भोकरच्या माजी सरपंच मंगला कांबळे तसेच भोकर येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश कांबळे यांच्या त्या पुतणी आहेत. तसेच भैरवनाथ येथील पोलीस पाटील स्वप्नील शिंदे यांच्या त्या सुविद्य पत्नी असून, डाक विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी सुनील शिंदे व ग्रामपंचायत सदस्य आशा शिंदे यांच्या त्या स्नुषा आहेत.



वैजापूर-हरेगावमार्गे पुणे बससेवा बंद; प्रवाशांची गैरसोय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर विभागातील वैजापूर आगारामार्फत सुरू करण्यात आलेली वैजापूर-हरेगाव-श्रीरामपूरमार्गे पुणे बससेवा अचानक बंद करण्यात आल्याने हरेगाव, उंदीरगाव, नाऊर परिसरातील प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. ही बससेवा कोणत्या कारणामुळे बंद करण्यात आली, याबाबत नागरिकांना कोणतीही माहिती नसल्याने प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

परिसरातील नागरिकांना थेट पुण्याला जाण्याची सुविधा मिळावी, या उद्देशाने ही बससेवा सुरू करण्यात आली होती. वैजापूर येथून सकाळी ८.१५ वाजता बस पुण्याच्या दिशेने रवाना होत असे, तर पुण्याहून दुपारी ३ वाजता परतीचा प्रवास सुरू होत असे. या सेवेमुळे महिला, विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक तसेच नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांची सोय झाली होती. मात्र, अचानक बस बंद झाल्याने प्रवाशांना बसची प्रतीक्षा करूनही अन्य पर्यायी बसने श्रीरामपूर गाठावे लागत आहे. त्यानंतर पुढील प्रवासासाठी पुण्याकडे जाणारी बस पकडावी लागत असल्याने वेळ आणि पैसाही अधिक खर्च होत आहे. ही गैरसोय दूर करण्यासाठी वैजापूर आगाराने वैजापूर-हरेगाव-श्रीरामपूरमार्गे पुणे बससेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी आमदार, खासदार आणि संबंधित लोकप्रतिनिधींकडे केली आहे.

श्रीक्षेत्र देवगड येथे मंगळवारी कार्तिकी पौर्णिमेचा भक्तिमय सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह राज्यभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री गुरुदेव दत्त पीठ, श्रीक्षेत्र देवगड येथे मंगळवारी (दि. २४ नोव्हेंबर) कार्तिकी पौर्णिमेचा सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, महापूजा, महाआरती आणि भव्य यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे महंत गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांनी केले आहे. कार्तिकी पौर्णिमेनिमित्त पहाटे ४.३० ते ६.१५ या वेळेत काकडा भजन व मंगल आरती होईल. सकाळी ७.३० ते ८.३० या वेळेत श्रीमद्भगवद्गीता व विष्णुसहस्रनाम पारायण होणार आहे. दुपारी १२ वाजता भगवान श्री दत्तात्रेय व कार्तिक स्वामी महाराजांची महाआरती होईल. सायंकाळी ५ ते ६ या वेळेत सामूहिक हरिपाठ व त्यानंतर आरती होणार आहे.

कार्तिकी पौर्णिमेला कार्तिक स्वामी महाराजांच्या दर्शनाला विशेष महत्त्व असल्याने देवगड येथे भाविकांची मोठी गर्दी होते. यावेळी पंचमुखी सिद्धेश्वर गणपती, भगवान दत्तात्रेय आणि श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा समाधी मंदिरातही दर्शनासाठी भाविकांची रीघ लागणार आहे. या सोहळ्यानिमित्त देवगड परिसरात भव्य यात्रा भरणार असून, प्रसाद, धार्मिक साहित्य, विविध वस्तू व खेळण्यांची दुकाने यात्रेचे आकर्षण ठरणार आहेत. प्रवरा नदीतील नौकाविहाराचाही भाविकांना आनंद घेता येणार आहे. सुट्टीचा दिवस असल्याने दोन्ही जिल्ह्यांतून हजारो भाविक येण्याची शक्यता आहे. संस्थानच्या वतीने दर्शनासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले असून, भाविकांनी धार्मिक सोहळा व यात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

निधनवार्ता

विजया शेवाळे

भेंडा : लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनिल शेवाळे यांच्या मातोश्री विजया पंडितराव



शेवाळे (वय ८५ वर्षे) यांचे रविवारी (दि.२२) वृद्धापकाळाने निधन झाले.
त्यांचा अंत्यविधी आज सोमवार दि.२३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता छत्रपती शिवाजीनगर वैकुंठधाम, मालेगाव कॅम्प, मालेगाव जि. नाशिक येथे होणार आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

सोमवार दि. २३ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे
उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

१३७ ३८० ३३५ — १-० — १३० २८० ४६० — १२-९०-७४-८५-०६

कल्याण
उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

१२० ६७० ३३७ — ३-९ — १८० २८९ ३८८ — ३१-७९-२५-०८-९४

मुंबैम (मेन)
उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

२३५ ३७० ४६० — ०-३ — १२० १७० ३०० — ०६-४३-९२-७१-३५

माधुरी बाजार डे / नाईट

१२६ ३८९ १९० — ०-६ — ४४६ १७८ ३४८ — ६४-८९-०१-६९-०८

८-२-३

dpbosssss.live

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
१३९	
३७	सुट्टी
४५८	

Mydpboss.com

प्लायवूड कंपनीला भीषण आग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

सोनगाव : सोनगाव-चनेगाव रस्त्यावरील धानोरे परिसरात असलेल्या प्लायवूड तयार करणाऱ्या कंपनीला भीषण आग लागून कंपनीतील प्लायवूड व भूसा जळून खाक झाला. बघता बघता आगीने उग्र रूप धारण केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीच्या ज्वाळांनी कंपनीच्या परिसरातील नारळ व आंब्याच्या झाडांनाही विळखा घातल्याने मोठे नुकसान झाले.

लाखोंचे नुकसान

सिंकदर तांबोळी (सात्रळ) हे सदर प्लायवूड कंपनी चालवत असून, कंपनीतील बॉयलरमधून उडालेल्या ठिणग्यांमुळे भूशाने पेट घेतल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. भूसा पेटल्यानंतर आगीने काही क्षणांतच रौद्र रूप धारण केले. आगीची तीव्रता इतकी होती की, परिसरात धुराचे लोट आणि आगीच्या उंचच उंच ज्वाळा दिसत होत्या. कंपनीतील प्लायवूड व इतर साहित्याने पेट घेतल्याने



मोठ्या प्रमाणावर साहित्य जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच पद्मश्री विखे पाटील कारखान्याची अग्निशमन यंत्रणा, देवळाली नगरपरिषदेची अग्निशमन यंत्रणा तसेच अन्य नगरपरिषदेच्या अग्निशमन यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करीत आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न केले. स्थानिक तरुणांनीही प्रसंगावधान राखत आग विझविण्याच्या कामात मोलाचे सहकार्य केले. या बचावकार्यात राहुरी पोलीस ठाण्याचे कर्मचारी रवी पवार, जयदीप बडे तसेच कदम यांच्यासह होमगार्ड कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. अग्निशमन दल, पोलीस कर्मचारी आणि स्थानिक तरुणांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आणण्यासाठी मदत झाली. या आगीत कंपनीतील प्लायवूड, भूसा आणि परिसरातील झाडांचे मोठे नुकसान झाले असून, नुकसानीचा नेमका आकडा अद्याप स्पष्ट झालेला नाही. आगीचे नेमके कारण आणि नुकसानीचा तपशील अधिकृत तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

भगवानगड परिसरातील सरपंचांचा प्रल्हाद किर्तने यांच्या उपोषणाला पाठिंबा

उपोषणाची प्रशासनाने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडणार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

खरवंडी कासार : भगवानगडाच्या पायथ्याशी असलेल्या सर्व गावांना जायकवाडी प्रकल्पाचे हक्काचे पाणी मिळावे, या मागणीसाठी ओबीसी योद्धा प्रल्हाद किर्तने यांनी खरवंडी कासार येथील मुंडे चौकात उपोषण सुरू केले आहे. मात्र, उपोषण सुरू असूनही प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याने भगवानगड परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या उपोषणाला परिसरातील अनेक गावांच्या सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.

भगवानगड परिसरातील गावांना जायकवाडी प्रकल्पाचे पाणी मिळावे, ही अनेक वर्षांपासूनची मागणी असून या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी उपोषणकर्ते प्रल्हाद किर्तने यांनी केली आहे. उपोषणस्थळी अद्याप प्रशासनातील कोणताही वरिष्ठ अधिकारी भेट देऊन चर्चा करत नसल्याने नागरिक आक्रमक झाले आहेत. प्रशासनाने उपोषणाची तातडीने दखल न घेतल्यास भविष्यात तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा परिसरातील सरपंच व ग्रामस्थांनी दिला आहे. आंदोलनाची परिस्थिती निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.



यावेळी खरवंडी कासारचे सरपंच प्रदीप पाटील अंदुरे, उपसरपंच रावसाहेब पवळे, ढाकणवाडीच्या सरपंच सुरेखाताई ढाकणे, उपसरपंच सुनील ढाकणे, मुंगूसवाडचे सरपंच प्रदीप खेडकर, मालेवाडीचे सरपंच सुनील खेडकर, उपसरपंच तुकाराम खेडकर, जळवडीचे सरपंच भगवान गोल्हार व उपसरपंच अशोक गोल्हार, भारजवाडीचे सरपंच माणिक बटुळे व कृष्णा खाडे, सरपंच भगवान हजारे व विष्णू थोरात, एकनाथवाडीच्या सरपंच नंदा डोंगरे व सचिन गायकवाड, भालगावचे सरपंच पोपट रोकडे व सतीश खेडकर, येळीचे सरपंच अक्षय कराड व आबा जायभाये, नांदूरचे सरपंच संजय देशमुख, भागवत वाघ, सोसायटीचे चेअरमन राजेंद्र जगताप व विश्वास खाडे आदींनी पाठिंबा दिला.

तसेच स्वाभिमान संघटनेचे पाथर्डी तालुकाध्यक्ष विकास वाघ आणि बळीराजा संघटनेचे युवा प्रदेश उपाध्यक्ष वैभव शिरसाठ यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला.

भगवानगड परिसरातील गावांना जायकवाडीचे हक्काचे पाणी मिळावे, या मागणीसाठी आता गावोगावच्या सरपंचांनी एकजूट दाखवली असून प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दखल



शेतकरी-आदिवासींच्या हक्कांसाठी लढणार : डॉ. नवले

अहिल्यानगर : शेतकरी, आदिवासी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गाच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे झुंजार नेते कॉम्रेड डॉ. अजित नवले यांना पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने 'स्वराज्यसेनानी' या किताबाने सन्मानित करून मानवंदना देण्यात आली. लोकशाही मूल्यांचे रक्षण, संविधानाची प्रभावी अंमलबजावणी आणि सर्वसामान्यांच्या मूलभूत अधिकारांसाठी लढणाऱ्या आधुनिक काळातील लढवय्यांना स्वतंत्र ओळख व राष्ट्रीय प्रतिष्ठा मिळावी, या उद्देशाने 'स्वराज्यसेनानी' ही अभिनव लोकसन्मान संकल्पना पुढे आणण्यात आली आहे. कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत जनतेने दिलेल्या कौलानंतरही मागच्या दाराने सत्ता मिळविण्यासाठी काढण्यात आलेल्या अध्यादेशाच्या निषेधार्थ पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने आंदोलन करण्यात आले. याच आंदोलनांतर्गत अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारक परिसरात महाराष्ट्राच्या मंत्रालयाचे प्रतीकात्मक नामकरण 'शकुनी-तंत्रालय' असे करण्यात आले. लोकशाही आणि सहकार व्यवस्थेचे कथित वस्त्रहरण रोखण्यासाठी लोकशाहीच्या पुतळ्याला तिरंग्याची वस्त्रे नेसविण्यात आली. यावेळी लोकशाही आणि सहकार वाचविण्याचा संदेश देण्यात आला. या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, शाहीर कान्हू सुंबे, अशोक भोसले, पोपट भोसले, अभिमान शिंदे, राजू उमाप, प्रवीण शिंदे, सोहम शिंदे, चतुरा शिंदे, दिगंबर साबळे, दत्तात्रय साबळे, निकिता रणदिवे, गीतल उमाप, वैशाली पेटारे, सनी शिंदे आदी सहभागी झाले होते.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन

अहिल्यानगर : जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष, भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मा. खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्मित डेंटल क्लिनिक, प्रोफेसर चौक, सावेडी, अहिल्यानगर यांच्या वतीने डॉ. सुमित नलावडे यांच्या पुढाकाराने भव्य मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २३, २४ व २५ नोव्हेंबर २०२६ रोजी स्मित डेंटल क्लिनिक येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांतर्गत ज्येष्ठ नागरिकांची मोफत दंत तपासणी, लहान मुलांच्या दातांची मोफत तपासणी तसेच वेडेवाकडे दात सरळ करण्यासाठी ऑर्थो डॉन्टिक उपचार (दातांना क्लिप्स लावणे) याबाबत मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या शिबिराचे उद्घाटन महापौर सौ. ज्योती अमोल गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी नगरसेवक महेश लोंढे, संपत नलावडे, युवराज चव्हाण, अथर्व वासकर, पार्थ सोमाणी, प्रज्वल जेजुरकर यांच्यासह स्मित डेंटल क्लिनिकमधील सर्व डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी व इतर मान्यवर उपस्थित होते. नागरिकांमध्ये दंत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी तसेच समाजातील सर्व घटकांना दंत आरोग्य तपासणी व योग्य उपचारांबाबत मार्गदर्शन मिळावे.

अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगचे प्रारंभ

कडाक्याच्या थंडीतही मैदानावर खेळाडूंचा थरार रंगला

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : शहरातील फुटबॉल खेळाडूंच्या क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देणाऱ्या अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या पर्वाचा प्रारंभ नगर क्लबच्या मैदानावर मोठ्या उत्साहात झाला. शहरात कडाक्याची थंडी असतानाही मैदानावर उतरलेल्या आठही संघांतील खेळाडूंच्या दमदार खेळाने आणि चुरशीच्या सामन्यांनी वातावरण चांगलेच तापले आहे. सकाळपासून सुरू झालेले सामने रात्री उशिरापर्यंत रंगत असून, फुटबॉलप्रेमींना दिवस-रात्र सामन्यांचा थरार अनुभवायला मिळत आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी क्रीडा पत्रकार जोसेफ विल्यम्स, नमोह फुटबॉल क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया, महावीर ग्रुपचे राजेश भंडारी, डॉ. अमोल जाधव यांच्यासह विविध संघांचे मालक व त्यांचे प्रतिनिधी, खेळाडू, प्रशिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन सोहळ्यात खेळाडूंनी आपापल्या संघांचे ध्वज घेऊन संचलन केले. यावेळी खेळाडूंनी सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखदार सोहळ्यात पाचव्या पर्वाचा शुभारंभ झाला.

प्रास्ताविकात नमिता फिरोदिया म्हणाल्या की, ग्रास रूटवर जाऊन फुटबॉलचे खेळाडू घडविण्याचे कार्य नमोह फुटबॉल क्लब करत आहे. ८०० मुलांना फुटबॉल खेळाचे प्रशिक्षण दिले जात आहे. क्लबच्या माध्यमातून विविध ७५ टूर्नामेंट घेण्यात आले आहे. शहरात फुटबॉलचे टॅलेंट वाढवण्याचे व खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम या स्पर्धेतून केले जात आहे. सर्वांना सोबत घेऊन शहरात फुटबॉलचा इतिहास घडविण्यासाठी योगदान दिले जात असल्याचे त्या म्हणाल्या. जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका म्हणाले की, मैदानी स्पर्धेतून खेळाडूंमध्ये शिस्त निर्माण होते. आपल्या देशात मोठ्या प्रमाणात गुणवत्ता आहे, मात्र त्याला प्रोत्साहन व व्यासपीठ देण्याची गरज आहे.

अशा स्पर्धेतून खेळाडूंना प्रोत्साहन मिळत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. खेळातून शिस्त, बौद्धिक क्षमता व शारीरिक क्षमता विकसित होते. युवकांमध्ये आत्मविश्वास वाढतो. खेळावर प्रेम करा, खेळातून भरपूर तुम्हाला मिळेल. सध्या शहरी भागात मोबाईलमुळे मैदानावर खेळणे कमी झाले असले तरी अहिल्यानगरमध्ये मैदानावर खेळाडू दिसतात. येथे रुजलेल्या क्रीडा संस्कृतीचे हे प्रतीक आहे. अभ्यासाबरोबर खेळायलादेखील महत्त्व द्या, आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडू घडावे, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.



एमकेसीएलच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त संचालिका अश्विनी काटे व सिद्धार्थ काटे यांचा सन्मान

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एमकेसीएल) च्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित वार्षिक आढावा बैठक २०२६ मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे केंद्र म्हणून संभाजी राजे कॉम्प्युटर अकॅडमीचा गौरव करण्यात आला. या उल्लेखनीय यशाबद्दल अकॅडमीच्या संचालिका सौ. अश्विनी सिद्धार्थ काटे व श्री. सिद्धार्थ काटे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांना दर्जेदार संगणक शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख आणि रोजगाराभिमुख कौशल्ये देण्यासाठी अकॅडमीने केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची ही पावती मानली जात आहे.

या कार्यक्रमाला एमकेसीएलचे झोनल कोऑर्डिनेटर अमित रानडे, सीनियर जनरल मॅनेजर अतुल पाटोदी, पुणे रिजनचे रिजनल मॅनेजर राहुल बारस्कर आणि एमआरसीयू कोऑर्डिनेटर विश्वजीत उत्तरवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा समन्वयक गणेश आठरे यांनी केले. यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता सज्जता कार्यक्रम पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी एसबीयू समन्वयक भाऊसाहेब आठरे यांनी उपस्थित केंद्रचालकांचे आभार मानले. या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त करताना संचालिका सौ. अश्विनी काटे यांनी भविष्यातही विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान देण्यासाठी अकॅडमी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

आरोग्य यंत्रणा कोमात; बोगस डॉक्टरांचे गावोगावी साम्राज्य!

शासकीय दवाखाने ओस, बंगाली डॉक्टरांची चलती श्रीगोंदा तालुक्यात रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरूच!

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्याची जबाबदारी असलेला आरोग्य विभागच सुस्तावल्याचे चित्र श्रीगोंदा तालुक्यात दिसत आहे. गावोगावी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे असूनही वेळेवर डॉक्टर उपलब्ध होत नसल्याने ग्रामीण आरोग्य सेवेचा अक्षरशः बोजवारा उडाला आहे. शासकीय आरोग्य यंत्रणेच्या या दुरवस्थेचा फायदा घेत कथित बोगस बंगाली डॉक्टरांनी ग्रामीण भागात आपले जाळे विस्तारले असून, रुग्णांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांची अवस्था दयनीय आहे. कुठे डॉक्टरांची अनुपलब्धता, कुठे औषधांचा तुटवडा, तर कुठे आरोग्य कर्मचाऱ्यांच्या अनियमित उपस्थितीमुळे रुग्णांना उपचारांसाठी वणवण करावी लागत आहे. लसीकरण किंवा शासकीय मोहिमांपुरतीच आरोग्य यंत्रणेची उपस्थिती जाणवत असल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. डॉक्टर नेमके कधी येतात आणि कधी जातात, याचा थांगपत्ताही अनेकदा लागत नसल्याचे चित्र आहे.

साधा ताप, सर्दी, खोकला किंवा अंगदुखी झाली तरी उपचारांसाठी १० ते १५ किलोमीटर दूर जावे लागत असेल, तर ग्रामीण नागरिकांनी जायचे कुठे? याच परिस्थितीचा फायदा घेत काही कथित बोगस डॉक्टरांनी गावोगावी दवाखाने थाटले आहेत. चोवीस तास उपलब्ध असल्याचा दावा, घराजवळ उपचार आणि कमी खर्चाचे आमिष यामुळे नागरिक त्यांच्याकडे वळत आहेत. मात्र, संबंधितांकडे वैद्यकीय उपचारांची अधिकृत पात्रता आणि परवाने आहेत का, याची तपासणी करण्याची जबाबदारी असलेला आरोग्य विभाग नेमके काय करतोय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे, एखाद्या ठिकाणी कारवाई करून प्रसिद्धी मिळविण्यापेक्षा तालुकाभरातील अशा दवाखान्यांची व्यापक तपासणी होणे गरजेचे आहे. केवळ दोन-चार कारवायांनी हा प्रश्न सुटणार नाही. गावोगावी सुरू असलेल्या कथित बोगस दवाखान्यांची यादी तयार करून त्यांची पात्रता, नोंदणी आणि औषधोपचार पद्धतीची तपासणी करण्याची मागणी होत आहे.

शासकीय आरोग्य सेवा अपुरी आणि खासगी उपचार महागडे, अशा कात्रीत ग्रामीण जनता सापडली आहे. आरोग्य विभागाने तातडीने प्रत्येक गावातील आरोग्य सुविधांचा आढावा घेऊन डॉक्टरांची नियमित उपस्थिती, औषधांचा पुरवठा आणि बोगस डॉक्टरांविरोधात कठोर कारवाई करावी. अन्यथा ग्रामीण नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

आरोग्य अधिकाऱ्यांना काही प्रश्न!

* प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टरांची नियमित उपस्थिती का नाही?
* उपकेंद्रांमध्ये औषधांचा पुरेसा साठा का उपलब्ध होत नाही?
* गावोगावी सुरू असलेल्या कथित बोगस दवाखान्यांची तपासणी कोण करणार?
* बोगस डॉक्टरांवर कारवाई केल्यानंतर पुन्हा तेच दवाखाने सुरू कसे होतात?
* ग्रामीण जनतेला वेळेवर उपचार मिळण्याची जबाबदारी कोणाची?

सरकारी दवाखाने असूनही रुग्णांना बोगस डॉक्टरांचा आधार घ्यावा लागत असेल, तर आरोग्य विभागाच्या कामगिरीचे मूल्यमापन होणार कधी?

इनरव्हील क्लब ऑफ शेवगावतर्फे 'हिरकणी कक्ष'

आ. मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : प्रवासादरम्यान बाळाला स्तनपान करण्यासाठी मातांना सुरक्षित, स्वच्छ आणि गोपनीय जागा उपलब्ध व्हावी, या सामाजिक बांधिलकीतून इनरव्हील क्लब ऑफ शेवगाव, डिस्ट्रिक्ट ३१३ तर्फे शेवगाव एस.टी. स्टँड येथे 'हिरकणी कक्ष' उभारण्यात आला आहे. या कक्षाचे उद्घाटन दिनांक २३ नोव्हेंबर, सोमवार रोजी सकाळी ९ वाजता माननीय आमदार मोनिकाताई राजळे यांच्या शुभहस्ते फीत कापून होणार आहे.



आजच्या धावपळीच्या जीवनात आणि प्रवासादरम्यान स्तनदा मातांना बाळाला दूध पाजण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा मातांना सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि स्वच्छ वातावरणात स्तनपान करता यावे, या उदात्त हेतूने हिरकणी कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. हा उपक्रम महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

या कक्षाच्या उभारणीसाठी शेवगाव एस.टी. डेपोचे डेपो मॅनेजर आदरणीय चौधरी साहेब यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. या सामाजिक उपक्रमाचे मुख्य प्रायोजक डॉ. वेदांत संजय लड्ढा (त्वचारोगतज्ज्ञ, अहिल्यानगर) आणि डॉ. मनीषा लड्ढा (चार्टर प्रेसिडेंट, इनरव्हील क्लब ऑफ शेवगाव) आहेत. इनरव्हील क्लब ऑफ शेवगावच्या अध्यक्षा रूपाली तडवळकर, सचिव डॉ. मनीषा लड्ढा, खजिनदार भाविका आर्य आणि आयएसओ वसुधा सावरकर यांनी या प्रकल्पासाठी विशेष पुढाकार घेतला असून क्लबच्या सर्व सदस्यांचेही या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे.

श्री साईबाबा मंदिर वर्धापन दिनानिमित्त पालखी मिरवणूक उत्साहात

अहिल्यानगर : नालेगाव येथील वाघगल्ली परिसरातील श्री साईबाबा मंदिराच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त तसेच द्वितीय तपपूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित श्री साईबाबा पालखी मिरवणूक उत्साहात संपन्न झाली. श्रीराम मंदिर नवीपेठ येथून पालखी मिरवणुकीला प्रारंभ झाला. साईनामाचा जयघोष, भक्तिमय वातावरण आणि भाविकांच्या सहभागाने पालखी सोहळा भक्तिभावाने पार पडला. ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री यांच्या कृपाशीर्वादाने व कै. पै. सुरेशराव शेळके यांच्या प्रेरणेने आयोजित या सोहळ्यात भाविकांनी पालखी मिरवणुकीत सहभागी होत साईबाबांच्या चरणी श्रद्धा व्यक्त केली. पालखी मिरवणुकीनंतर सायंकाळी ७.३० वाजता साई आरतीकरण्यात आली. यावेळी आयोजक नगरसेवक गणेश कवडे यांनी मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पालखी सोहळ्याचे महत्त्व सांगितले. मंदिराच्या स्थापनेपासून सुरू असलेली धार्मिक परंपरा जपण्यासाठी आणि परिसरातील भाविकांना एकत्र आणण्यासाठी अशा उत्सवांचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. साईबाबांच्या विचारांचा प्रसार, भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकोपा वाढविण्याच्या उद्देशाने दरवर्षी वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. भाविकांनी धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन मंदिराच्या परंपरेला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त सायंकाळी ४ वाजता श्री संत नामदेव भजनी मंडळाचा कार्यक्रम आणि सायंकाळी ७ वाजता ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे कीर्तन होणार झाले तसेच ह.भ.प. अमोल महाराज गाडे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे.

दुष्काळात ६६८ मुक्या जीवांना चाऱ्याचा आधार!

'सुजय पंधरवडा'तून पिंपळगाव कौडा गोशाळेला ५ टन चारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नगर तालुका : दुष्काळाच्या झळा केवळ माणसांनाच नव्हे तर पशुधनालाही सोसाव्या लागत आहेत. अशा परिस्थितीत मुक्या जीवांच्या चाऱ्याचा प्रश्न लक्षात घेऊन पिंपळगाव कौडा येथील कवडेश्वर मंदिर परिसरातील गोशाळेतील ६६८ जनावरांसाठी तब्बल पाच टन चाऱ्याचे वाटप करण्यात आले. वाढदिवसाचा उत्सव केवळ शुभेच्छा आणि सत्कारापुरता मर्यादित न ठेवता पशुधनाची भूक भागविण्याच्या सामाजिक भावनेतून राबविलेला हा उपक्रम परिसरात चर्चेचा विषय ठरला आहे.



अहिल्यानगर जिल्हा बँकेचे चेअरमन सुजयदादा विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सुजयदादा पंधरवडा' अंतर्गत सुजयदादा विखे पाटील विचारमंचाचे अध्यक्ष सिद्धांत आंधळे व भाजपाचे उपजिल्हाप्रमुख मनोज ठोकळ यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. गोशाळेतील ६६८ जनावरांच्या चाऱ्याची गरज लक्षात घेऊन पाच टन चाऱ्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते, भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील व दूध संघाचे चेअरमन दत्ता नाना पवार यांच्या हस्ते चारा वाटप करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ प्रा. बी. एन. शिंदे, उद्योजक प्रदीप साठे, गोरख कातोरे, माजी उपसरपंच अनिल आंधळे, मज्जीद शेख, राहुल कातोरे, रोहिदास कातोरे, ओमकार राजगुरू, चंद्रकांत ठोकळ, आप्पा ढमाले, गोकुळ लष्करे, सुरेश भुजबळ, किरण (बाप्पू) ठोकळ यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'सुजयदादा पंधरवडा'च्या माध्यमातून केवळ पशुधनासाठीच नव्हे तर समाजातील विविध गरजू घटकांसाठी उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

वन्यजीवांची तहान भागविण्यासाठी जंगल परिसरात पाणवठे तयार करून त्यामध्ये पाणी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांना जंगलातच पाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

याशिवाय ज्येष्ठ नागरिकांना वयोश्री योजनेअंतर्गत आवश्यक साहित्य मिळवून देणे, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करणे, तसेच गरजू कुटुंबांना किराणा किटचे वाटप असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

तरुणांनी सामाजिक उपक्रमांत पुढाकार घ्यावा ! सुजयदादा विखे पाटील विचारमंचाच्या माध्यमातून राबविण्यात येणारे सामाजिक उपक्रम अत्यंत स्तुत्य व प्रेरणादायी आहेत. विचारमंचाचे अध्यक्ष सिद्धांत आंधळे व उपजिल्हाप्रमुख मनोज ठोकळ यांचे विशेष कौतुक. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून तालुक्यातील तरुणांनीही अशा सामाजिक उपक्रमांत पुढाकार घ्यावा. समाजातील गरजू घटकांना मदत करण्याबरोबरच मुक्या जीवांची सेवा करणे हीदेखील महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे.

– आ. काशिनाथ दाते

दखल

दुष्काळाच्या संकटातून सावरण्यासाठी बळ दे!

कार्तिकी एकादशीनिमित्त डाळिंब येथील प्रति पंढरपूर मंदिरात भाविकांचे विठ्ठलाला साकडे



यवत : यंदाच्या दुष्काळजन्य संकटातून सावरण्याचे बळ दे आणि बळीराजाच्या जीवनात पुन्हा आनंदाचे दिवस येऊ दे, असे आर्त साकडे शनिवारी (दि. २१) कार्तिकी एकादशीनिमित्त हजारो भाविकांनी डाळिंब बन (ता. दौंड) येथील प्रति पंढरपूर श्री विठ्ठल-रुक्मिणी चरणी घातले. टाळ-मृदुंगाचा गजर आणि 'विठ्ठल-विठ्ठल' नामघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. दौंड, पुरंदर आणि हवेली या तीन तालुक्यांच्या सीमेवरील निसर्गरम्य परिसरात डाळिंब बन हे तीर्थक्षेत्र वसलेले आहे. वारकरी संप्रदायाचे मोठे श्रद्धास्थान आणि 'प्रति पंढरपूर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मंदिरात ज्या भाविकांना पंढरपूरला जाणे शक्य होत नाही, ते दर्शनासाठी आवर्जून येतात. शनिवारी पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

मुळशी धरणाचे ८ टीएमसी पाणी पुणे जिल्ह्यासाठी देण्यास मान्यता

आमदार राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला यश



यवत : मुळशी धरणातील ८ टीएमसी पाणी पुणे जिल्ह्यासाठी उपलब्ध करून देण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. मुळशी धरणाचे पाणी पूर्वमुखी वळवण्यासंदर्भात दौंडचे आमदार राहुल कुल यांनी केलेला निर्धार आणि त्यासाठी केलेला सातत्यपूर्ण व अभ्यासपूर्ण पाठपुरावा अखेर यशस्वी ठरला आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे पुणे जिल्ह्यातील विशेषतः दुष्काळी आणि शेतीच्या पाण्याची टंचाई असलेल्या भागांना मोठा दिलासा मिळणार आहे. पाणीप्रश्न सोडवण्यासाठी आमदार कुल यांनी शासन स्तरावर सातत्याने प्रयत्न केले होते. त्यांच्या या प्रयत्नांना यश आल्याबद्दल पुणे जिल्ह्यासह मतदारसंघातील शेतकरी व सर्वसामान्य जनतेकडून आमदार राहुल कुल यांचे अभिनंदन केले जात असून, या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

अनुपस्थित व स्थलांतरित मतदारांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी

पुणे : विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान काही कारणास्तव घरी अनुपस्थित असलेले किंवा कामानिमित्त परदेशात गेलेले मतदार तसेच पत्ता बदलल्यामुळे मसुदा मतदार यादीत नाव समाविष्ट न होऊ शकलेले मतदार यांना अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी संबंधित मतदारांनी आवश्यकतेनुसार परिशिष्ट-ब किंवा परिशिष्ट-क भरून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

एसआयआर प्रक्रियेदरम्यान प्रगणकांकडून गणना अर्जाचे (एन्युमरेशन फॉर्म) वाटप करण्यात येत असताना काही मतदार कामानिमित्त परदेशात गेले होते किंवा मतदार यादीत नमूद केलेल्या पत्त्यावर उपलब्ध नव्हते. अशा मतदारांना परिशिष्ट-ब भरून पुन्हा अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज करता येणार आहे.तसेच, ज्या मतदारांची नावे अनुपस्थित, स्थलांतरित, मृत अथवा दुबार (एएसडीडी) या वर्गवारीत समाविष्ट झाल्यामुळे मसुदा मतदार यादीत आलेली नाहीत आणि जे मतदार आता मतदार यादीतील जुन्या पत्त्यावर राहत नसून अन्य ठिकाणी स्थलांतरित झाले आहेत, त्यांनी परिशिष्ट-क भरावे.अशा मतदारांनी पुण्यातील जुन्या मतदार यादीत नमूद असलेल्या पत्त्याच्या भागातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडून परिशिष्ट-क प्राप्त करून घ्यावे आणि स्थलांतरित झालेल्या नवीन ठिकाणी ते सादर करावे. यामुळे संबंधित मतदाराचे नाव नवीन ठिकाणच्या मतदार यादीत समाविष्ट होण्यास मदत होईल.

पशुधन उद्योजकता योजनेचे अर्ज २६ नोव्हेंबरपासून

दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालनासाठी अनुदान; महाडीबीटी २.० वर अर्ज प्रक्रिया

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : ग्रामीण भागातील शेतकरी, महिला आणि तरुणांना पशुपालनाच्या माध्यमातून स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना सुरू केली आहे. या योजनेच्या ऑनलाइन अर्ज स्वीकृतीला २६ नोव्हेंबर २०२६ पासून महाडीबीटी २.० प्रणालीवर टप्प्याटप्प्याने सुरुवात होणार आहे. ही माहिती पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दुधाळ गायी, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, कुक्कुटपक्षी आणि वराहपालनासाठी तसेच वैरण उत्पादन व पशुसंवर्धन व्यवसायासाठी निवडक संसाधनांचा अनुदान तत्त्वावर लाभ दिला जाणार आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळी-मेंढी पालनाला आर्थिक पाठबळ मिळणार असल्याने ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे.

जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय योजनांसाठी विविध प्रवर्गांतील अर्ज उपलब्ध निधीच्या प्रमाणात स्वीकारले जाणार आहेत. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वानुसार निधीच्या मर्यादेत पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळेल.

असा करा ऑनलाइन अर्ज :

इच्छुक शेतकरी व पशुपालकांनी https://mahadbt2.maharashtra.gov.inG$ या संकेतस्थळावर जाऊन पशुसंवर्धन विभागाच्या योजना हा पर्याय निवडावा. मोबाईल, संगणक, महाईसेवा केंद्र किंवा आपले सरकार केंद्रामार्फत अर्ज करता येईल. अर्जासाठी महा-आयडीद्वारे लॉगिन करणे बंधनकारक आहे. आधार प्रमाणीकरण करून महा-आयडी तयार करावा. हा क्रमांक मिळण्यासाठी साधारणतः २४ तासांचा कालावधी लागतो. जमीन नावावर असलेल्या; परंतु फार्मर आयडी नसलेल्या अर्जदारांनी ॲग्रीस्टॅक प्रणालीवर नोंदणी करून फार्मर आयडी तयार करणे आवश्यक आहे. जमीन आवश्यक असलेल्या योजनांसाठी फार्मर आयडी नसल्यास अर्ज करता येणार नाही. अर्जदाराची वैयक्तिक माहिती विविध शासकीय प्रणालींतून स्वयंचलित पद्धतीने उपलब्ध होईल. अर्ज करताना आवश्यक घटक काळजीपूर्वक निवडावेत.

अर्ज सादर केल्यानंतर योजना किंवा घटक बदलता येणार नाहीत. चुकीची माहिती भरल्यास दुरुस्तीसाठी यापूर्वी सादर केलेले अर्ज रद्द होतील. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला योजनेचा लाभ मिळणार असल्याने रेशनकार्ड तयार ठेवणे आवश्यक आहे.

आधारसंलग्न बँक खाते आवश्यक :

योजनेचे अनुदान थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने आधारसंलग्न बँक खात्यात जमा केले जाणार आहे. त्यामुळे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडलेले असावे. पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवरील नोंदणी अद्ययावत करण्यासाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा.

योजनेबाबत माहिती किंवा तक्रारींसाठी पशुसंवर्धन विभागाच्या १९६२ या टोल फ्री क्रमांकावर किंवा ९०६३१४२२९९ या व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधता येईल. महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणींसाठी ०२२-४९१५०८०० हा क्रमांक उपलब्ध आहे.

फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई :

योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी कोणत्याही खासगी संस्था किंवा व्यक्तीला शासनाने अधिकृत केलेले नाही. योजनेबाबत दिशाभूल करणारी माहिती पसरवून लाभार्थ्यांची फसवणूक केल्याचे आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पशुसंवर्धन विभागाने दिला आहे.

डॉ.राजेंद्रप्रसाद परदेशी यांची वैद्यकीय सेवा गौरवास्पद-महापौर मंजुषा नागपुरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : वैद्यकीय क्षेत्रातील डॉ.राजेंद्रप्रसाद परदेशी यांचे वैद्यकीय क्षेत्रातील कार्य अतुलनीय असून, या कार्याबद्दल त्यांना मिळालेली डॉक्टरेट पदवी गौरवास्पद आहे, असे महापौर मंजुषा नागपुरे यांनी आज (शनिवारी) येथे बोलताना सांगितले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती दुस्टचे वैद्यकीय सेवा व्यवस्थापक डॉ .राजेंद्रप्रसाद परदेशी यांना वैद्यकीय समाजकार्याबद्दल सिक्कीम सरदार पटेल विद्यापीठाची डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (हॉनॉरिस कॉसा) ही प्रतिष्ठित पदवी नुकतीच प्राप्त झाली .. या निमित्ताने सिद्धेश ॲकॅडमी, श्री विघ्नेश सोशल फाउंडेशन आणि अखिल हिंदू राजपूत समाज संघ यांच्यावतीने डॉक्टर परदेशी यांचा सत्कार महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी इंडियन मेडिकल असोसिएशन च्या अध्यक्ष डॉ.अलका क्षीरसागर, पुणे म न पा आरोग्य प्रमुख डॉ. सूर्यकांत देवकर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ॲड.प्रताप परदेशी, डॉ मिलिंद भोई, सिद्धेश ॲकॅडमी चे अध्यक्ष डॉ संदेश पटवर्धन,

श्री विघ्नेश फाउंडेशनचे पदाधिकारी ,अखिल हिंदू राजपूत समाज संघाचे अध्यक्ष सोमनाथ परदेशी , राजपूत महिला मंडळ



अध्यक्ष जयश्री परदेशी, महाराणा प्रताप युवक मंडळ पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट च्या माध्यमातून वैद्यकीय सेवा करत डॉक्टर राजेंद्रप्रसाद परदेशी यांनी आपुलकी ठेवून लाखो रुग्णांना दिलासा दिला आहे, अशी प्रशंसा महापौर नागपुरे यांनी केली.

वैद्यकीय सेवेसाठी डॉक्टर राजेंद्रप्रसाद परदेशी यांनी अपार कष्ट घेतले. त्यासाठी समाजाने कृतज्ञ रहायला हवे, असे ॲड.प्रताप परदेशी यांनी कार्यक्रमात बोलताना सांगितले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट च्या पदाधिकारी आणि विश्वस्तांनी मला सेवा बजावण्याची संधी दिली. ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरूण मंडळाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे मला समाजाकरिता काम करता आले. गणपती बाप्पावर श्रद्धा ठेवून मी वाटचाल केली, असे मनोगत डॉक्टर राजेंद्रप्रसाद परदेशी यांनी सत्कारप्रसंगी बोलताना व्यक्त केले.

हा सत्कार सोहळा मराठा चेंबर ऑफ कॉमर्स च्या सभागृहात अतिशय दिमाखात संपन्न झाला. मोठ्या संख्येने राजपूत समाज बांधव उपस्थित राहून त्यांनी डॉक्टर राजेंद्रप्रसाद परदेशी यांना शुभेच्छा देण्यात आल्या. अमिता पटवर्धन यांनी आभार मानले. अमित चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूनम परदेशी यांनी केले.

समान नागरी कायद्याबाबत पुणे विभागात २९ नोव्हेंबरला जनसुनावणी

नागरिकांना मते मांडण्याची संधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : समान नागरी कायद्याबाबत (यूसीसी) नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी पुणे विभागात २९ नोव्हेंबर २०२६ रोजी विभागीय स्तरावर विभागीय जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. या जनसुनावणीत हितसंबंधित गट, संस्था यांचे प्रतिनिधी तसेच नागरिकांनी निर्धारित दिवशी व निर्धारित वेळेत उपस्थित राहून आपली मते मांडावीत, असे आवाहन पुणे विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

पुणे महसूल विभागातील जनसुनावणीचे आयोजन २९ नोव्हेंबर रोजी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयातील झुंबर सभागृहात करण्यात आले आहे. सुनावणीचे नियोजन जिल्हानिहाय करण्यात आले असून २९ नोव्हेंबर रोजी सातारा जिल्हा सकाळी १० ते ११ या वेळेत, सांगली सकाळी ११.३० ते १२.३०, सोलापूर दुपारी १ ते २, कोल्हापूर दुपारी ३ ते सायंकाळी ४ आणि पुणे जिल्ह्यासाठी सायंकाळी ४.३० ते ५.३० या वेळेत होईल.

या जनसुनावणीसाठी नागरिकांनी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात किंवा संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील निर्धारित वेळेच्या एक तास आधी समक्ष उपस्थित राहावे.या समितीचे सदस्य हे सुनावणी कामी पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे विभागीय आयुक्त कार्यालयात उपस्थित राहणाऱ्या नागरिकांची सुनावणी ही समिती पुढे प्रत्यक्ष होईल.

तसेच संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित असणाऱ्या नागरिकांची सुनावणी ही व्हिडियो कॉन्फरसिंगद्वारे घेण्यात येणार आहे. ज्या नागरिकांना केवळ ऑनलाईन पद्धतीने मते नोंदवायची आहेत त्यांना महाराष्ट्र शासनाच्या www.ucc.maharashtra.gov.in या समान नागरी कायदा पोर्टल वर ३७ मुद्यांची माहिती देता येईल, असेही कळविण्यात आले आहे.

'दगडूशेठ' गणपती ट्रस्ट तर्फे साखरे महाराज मठात श्रीकृष्ण-तुळशी विवाह सोहळा

गणेश कुंभकर्ण । राष्ट्र सह्याद्री

पुणे : राधे-कृष्ण, गोपाल कृष्ण चा जयघोष... रांगोळीच्या पायघडया... शुभमंगल सावधानचे मंगल सूर... अशा पारंपरिक वातावरणात मंडईतील साखरे महाराज मठामध्ये तुळशीविवाह सोहळा पार पडला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टतर्फे आयोजित विवाह सोहळ्यात श्रीकृष्ण - तुळशी चरणी नतम स्तक होत, सुख-समृद्धी साठी पुणेकरांनी मागणे मागितले.

निमित्त होते, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने मंडईतील साखरे महाराज मठ येथे आयोजित तुळशीविवाह सोहळ्याचे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरापासून निघालेली मिरवणूक मंडईतील साखरे महाराज मठात येताच उपस्थितांनी राधे कृष्णचा जयघोष केला. चौका-चौकात मिरवणुकीचे स्वागत करत, श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष महेश सूर्यवंशी, कोषाध्यक्ष सुनील रासने, विश्वस्त अमोल केदारी, राजाभाऊ घोडके, संतोष रसाळ,



गजानन धावडे, सचिन चव्हाण, दिगंबर गायकवाड, संदीप शिंदे यांसह ज्योति सूर्यवंशी, संगीता रासने, मृणालिनी रासने, राजश्री गोडसे, सुलोचना रासने, सौ. लोंढे, श्रीमती खोपडे, सोनाली सिद्ध यांसह साखरे महाराज मठाचे मोडक परिवार व भगिनी आदी उपस्थित होते.

ट्रस्टचे अध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, भगवान विष्णूला तुळशी खूप प्रिय आहेत, तुळस ही लक्ष्मीचे स्वरूप मानली जाते. तुळशी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे. तुळशी विवाह म्हणजे तुळशी (पवित्र तुळस) वनस्पतीच्या रोपाचे शालिग्राम किंवा विष्णू किंवा त्यांचे अवतार श्रीकृष्ण याच्याशी विवाह, प्रबोधिनी एकादशीपासून करण्याची पूजोत्सव प्रथा आहे. त्यामुळे ट्रस्टतर्फे हा उत्सव सन १९८४ पासून सुरु असून दरवर्षी उत्साहात साजरा केला जातो.

दगडूशेठ गणपती मंदिरामध्ये सकाळी श्रीकृष्णाच्या मूर्तीचे पूजन झाल्यानंतर पारंपरिक पद्धतीने मिरवणुकीला प्रारंभ झाला. तुळशी वृंदावन आणि श्रीकृष्णाची मूर्ती घेऊन रथातून मिरवणूक काढण्यात आली. दरबार ब्रास बँड मिरवणुकीत वादन करत होते. रांगोळीच्या पायघड्यांनी मिरवणुकीचा संपूर्ण मार्ग सुशोभित करण्यात आला होता.

समाधान चौक-रामेश्वर चौक-टिळक पुतळा मंडईमार्गे साखरे महाराज मठात मिरवणुकीचा समारोप झाला. त्यानंतर विवाह समारंभ झाला. उपस्थित भाविकांनी श्रीकृष्ण-तुळशी चे दर्शन घेतले.

भूमिपुत्र प्रतिष्ठानच्या स्पर्धा कौतुकास्पद

उद्योजक प्रकाश धारिवाल यांचे मत; गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे बक्षीस वितरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरूर : गणेशोत्सव व गौरीपूजन सण समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे काम करतात. भूमिपुत्र प्रतिष्ठानने घेतलेल्या स्पर्धा कौतुकास्पद असल्याचे मत शिरूरचे माजी नगराध्यक्ष व उद्योजक प्रकाश धारिवाल यांनी व्यक्त केले.

गणशोत्सवात येथील भूमिपुत्र प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या घरगुती गौरी-गणपती सजावट स्पर्धेचा बक्षीस वितरण धारिवाल यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

पारितोषिक वितरण समारंभास शिरूरच्या नगरध्यक्षा सौ ऐश्वर्या पाचर्णे,पुणे विभागीय कार्यालयाचे सहआयुक्त संजीव पलांडे,राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेते दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे आदीसह विविध क्षेत्रातील प्रमुख मान्यवर नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

या स्पर्धेत श्री कानिफनाथ शिवशंकर परदेशी,सौ माधुरी अर्जुन कराळे,व इशांक विशाल भावटनकर यांनी अनुक्रमे 'गौरी, गणपती आणि सेल्फी विथ बप्पा' या तिन्ही स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. विजेत्यांना उद्योजक प्रकाश धारिवाल यांच्या हस्ते 'गणराया करंडक २०२६' ने सन्मानित करण्यात आले.

गौरी निकाल पुढीलप्रमाणे सजावट प्रथम- मधुरा अर्जुन कराळे,द्वितीय-सौ रीना निलेश मैड,तृतीय-सौ संगीता शशिकांत कुलकर्णी चतुर्थ - कु. आकांक्षा अनिल वळे गणपती सजावट प्रथम-श्री कानिफनाथ शिवशंकर परदेशी, द्वितीय-सुषमा



स्वप्निल पडदुने तृतीय -कु आर्या जामदार चतुर्थ-कु ऋतिक अशोक जाधव सेल्फी विथ बाप्पा - प्रथम-इशांक विशाल भावटनकर द्वितीय-विश्वराज लव्हा चांदगुडे तृतीय-जान्हवी संजय डांगे चतुर्थ-रोहित संदीप लगड दरम्यान नेपाळ दुर्घटना व उपाययोजना यावर आधारित पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांच्या संस्थेचा आणि मराठी शाळा वाचवा या संदेशावर आधारित नगरपरिषद शाळा क्र ०१ चा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला या स्पर्धेसाठी श्रीमती सुरेखा रणदिवे, श्री रमेश सीताराम जाधव, सौ सुनंदा विजय लंघे सौ नीता महेंद्र सतीजा यांनी परीक्षण केले. स्पर्धेचे आयोजक भूमिपुत्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी प्रास्ताविक केले.योगेश जामदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ परवेज बागवान यांनी आभार मानले.भूमिपुत्र प्रतिष्ठानचे सदस्य सागर नरवडे,आशिष भोजने,बंडू दुधाणे,प्रज्वल ढेरे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले

अभय योजनेत सहभागी होऊन थकबाकीमुक्त व्हा : दिनेश अग्रवाल

पुणे परिमंडलातील ३५०७ ग्राहकांचे अर्ज; ६४८ ग्राहकांकडून ९४.३४ लाखांचा भरणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांना थकबाकीमुक्त होऊन पुन्हा वीजजोडणी घेण्याची अभय योजनेच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध झाली आहे. या योजनेत थकबाकीवरील १०० टक्के व्याज व विलंब आकार माफ होणार असून, मूळ थकबाकीच्या एकरकमी भरण्यावर २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. त्यामुळे पुणे परिमंडलातील सर्व पात्र ग्राहकांनी या योजनेत सहभागी होऊन थकबाकीमुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणचे कार्यकारी संचालक (वीज खरेदी) दिनेश अग्रवाल यांनी केले.

भोसरीत औद्योगिक ग्राहकाकडून ३८.३३ लाखांचा धनादेश

महावितरणचे कार्यकारी संचालक (वीज खरेदी) दिनेश अग्रवाल यांनी शनिवारी (दि. २१) इंद्रायणीनगर, भोसरी येथे थकबाकीदार ग्राहकांच्या वीजजोडण्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी एका औद्योगिक ग्राहकाने चालू थकीत वीजबिलापोटी अग्रवाल यांच्याकडे ३८ लाख ३३ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.

महावितरणच्या अभय योजनेला पुणे परिमंडलात प्रतिसाद मिळत असून, शनिवारपर्यंत (दि. २१) एकूण ३ हजार ५०७ ग्राहकांनी अर्ज केले आहेत. त्यापैकी ६४८ ग्राहकांनी ९४ लाख ३४ हजार रुपयांचा भरणा केला आहे. रास्तापेठ शहर मंडलातील ६०९ ग्राहकांपैकी १६९ ग्राहकांनी २१.५३ लाख रुपये, गणेशखिंड शहर मंडलातील ७७० ग्राहकांपैकी २४६ ग्राहकांनी ४४.२४ लाख रुपये, तर पुणे ग्रामीण मंडलातील २ हजार १२८ ग्राहकांपैकी २३३ ग्राहकांनी २८.५७ लाख रुपयांचा भरणा केला आहे.

पुणे परिमंडलातील अभय योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी कार्यकारी संचालक दिनेश अग्रवाल यांनी शनिवारी (दि. २१) भोसरी येथे भेट दिली. यावेळी त्यांनी योजनेच्या प्रगतीचा तसेच ग्राहकांच्या सहभागाचा आढावा घेतला. यावेळी गणेशखिंड मंडलाचे अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, कार्यकारी अभियंता विश्वनाथ लहाने, अतिरिक्त कार्यकारी अभियंता नितीन गिते तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पुणे परिमंडलातील गणेशखिंड, रास्तापेठ आणि पुणे ग्रामीण या तीन मंडलांमध्ये अभय योजनेसाठी २ लाख ८२ हजार ९७७ ग्राहक पात्र आहेत. यामध्ये २१२ उच्चदाब ग्राहकांकडे ७२.०६ कोटी रुपये, तर २ लाख ८२ हजार ७६५ लघुदाब व लघुदाब औद्योगिक ग्राहकांकडे ४२५.९५ कोटी रुपयांची थकबाकी आहे.महावितरणने ही योजना ६ नोव्हेंबर २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत लागू केली आहे. मूळ थकबाकीच्या कालावधीनुसार १० ते २० टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार असून, या विशेष 'अर्ली बर्ड इन्सेंटिव्ह'चा लाभ घेण्यासाठी संपूर्ण देय मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा १५ डिसेंबर २०२६ पर्यंत करणे आवश्यक आहे. एकरकमी भरणा शक्य नसलेल्या ग्राहकांसाठी व्याजमुक्त हप्त्यांची सुविधाही उपलब्ध आहे. त्यामुळे पात्र ग्राहकांनी मुदतीपूर्वी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रवाल यांनी केले.

द•ख•ल



'सृष्टीची उत्पत्ती आणि विनाश' देखाव्याला महापालिकेचा द्वितीय क्रमांक

अहिल्यानगर : अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने गणेशोत्सव २०२६ निमित्त आयोजित देखावा स्पर्धेत बागडपट्टीचा राजा मित्र मंडळाच्या 'सृष्टीची उत्पत्ती आणि विनाश' या देखाव्याला 'सोशल मीडिया आणि आधुनिक तंत्रज्ञान' या विभागात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते मंडळाला पारितोषिक प्रदान करण्यात आले. 'कलीचा पाश की निसर्गाचा विनाश' या संकल्पनेवर आधारित हा देखावा सामाजिक आणि आध्यात्मिक विषयाची प्रभावी मांडणी करणारा ठरला. वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, निसर्गाचा बिघडणारा समतोल आणि मानवी हस्तक्षेपामुळे सृष्टीसमोर उभे राहिलेले संकट यांचे चित्रण या देखाव्यातून करण्यात आले. आपणच आपल्या कृतीतून सृष्टीचा विनाश कशा प्रकारे करीत आहोत, याची जाणीव करून देत पर्यावरण रक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश या माध्यमातून देण्यात आला. या देखाव्याची संकल्पना आणि सजावट ऑरा डान्स अँड ॲक्टिंग अकॅडमीच्या वतीने करण्यात आली होती. जिवंत देखाव्यात ऑरा डान्स अँड ॲक्टिंग अकॅडमीच्या कलाकारांनी सादरीकरण केले. जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली कलाकारांनी देखाव्याला प्रभावी स्वरूप दिले.

क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून सभासदांमध्ये कौटुंबिक नाते निर्माण होते : जितेश सचदेव

अहिल्यानगर : आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या वतीने सलग चौथ्या वर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या एसा एपीएल सीझन-४ बॉक्स क्रिकेट स्पर्धेची लिलाव प्रक्रिया मोठ्या उत्साहात पार पडली. एकूण २० संघ आणि १४० सभासदांचा सहभाग असलेली ही संस्थेची वर्षातील सर्वात मोठी क्रीडा स्पर्धा २७ ते २९ नोव्हेंबरदरम्यान साई नगर टर्फ येथे रंगणार आहे. या स्पर्धेसाठी एस. आर. जे. स्टील हे प्लॅटिनम प्रायोजक आहेत. तर कोनॅटस इंटरप्रायझेस, टोस्टेम विंडोज आणि शनिराज इंटरनॅशनल मॉल हे गोल्ड प्रायोजक आहेत. याशिवाय व्यंकटेश इन्फ्रा, अंबिका स्टोन क्रशर, श्रीराम मार्बल, जी टेक, डायकिन एसी, श्री आनंद सेल्स, वैष्णवी टाईल्स, पंकज स्टील ट्रेडर्स, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, अभय सेल्स कॉर्पोरेशन, संकल्प इंटरप्रायझेस, आर्टिको लिफ्ट्स, डायमंड टाईल्स, शुभारंभ टाईल्स अँड ग्रॅनाइट, ढोणे ट्रेडर्स, पटेल सिरॅमिक आणि सम्राट इलेक्ट्रिकल यांनी सिल्व्हर प्रायोजक म्हणून सहभाग नोंदविला आहे. संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी उपस्थितांचे स्वागत करताना सांगितले की, यंदाचा स्पर्धा सोहळा भव्य स्वरूपात आयोजित करण्यात येणार आहे. स्पर्धेत एकूण ४० साखळी सामने आणि ७ बाद फेरीतील सामने खेळविण्यात येणार आहेत. लिलाव प्रक्रिया आयपीएलच्या धर्तीवर पार पडावी, यासाठी पुण्याहून सनीत मुथा आणि अंकित कोठारी यांची टीम विशेषतः निमंत्रित करण्यात आली होती. २५ आणि २६ नोव्हेंबर रोजी कल्याण रोड येथील पॉवर टर्फवर सराव सामने होणार असून, मुख्य स्पर्धेचे सामने २७ ते २९ नोव्हेंबरदरम्यान साई नगर टर्फ येथे खेळविण्यात येणार आहेत. संस्थेच्या स्पोर्ट्स कमिटीचे अध्यक्ष जितेश सचदेव म्हणाले की, संस्था मागील चार वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवित आहे.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यातच शिक्षकांचे खरे समाधान!

ऑर्किड इंटरनॅशनल स्कूलमध्ये बालदिन उत्साहात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



नगर तालुका : विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यातच शिक्षकांचे खरे समाधान दडलेले असते. विद्यार्थ्यांनी शिक्षणासह विविध क्षेत्रांत आपला ठसा उमटवून शाळेचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे यासाठी शिक्षक नेहमीच प्रयत्नशील असतात. विद्यार्थ्यांना सक्षम आणि संस्कारक्षम घडविण्याची जबाबदारी शिक्षक प्रामाणिकपणे पार पाडत असतात असे प्रतिपादन धनगरवाडी येथील ऑर्किड द इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या श्रीदेवी नायर यांनी केले.

धनगरवाडी येथील ऑर्किड द इंटरनॅशनल स्कूलमध्ये शनिवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी विद्यार्थ्यांना बालदिनाचे महत्त्व तसेच देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे जीवनकार्य आणि बालकांविषयी असलेले त्यांचे प्रेम याबाबत माहिती देण्यात आली.

बालदिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाल्याने संपूर्ण शाळेचे वातावरण आनंदमय झाले होते. विद्यार्थ्यांचा उत्साह आणि सादरीकरणाने उपस्थित पालकांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित पालकांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

स्नेहालयात लायन्स क्लबचा दीपोत्सव उत्साहात



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : वंचित घटकातील मुलांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण फुलवून त्यांची दिवाळी गोड करण्याच्या उद्देशाने लायन्स क्लब ऑफ अहिल्यानगर व लिओ क्लबच्या वतीने सलग १९ व्या वर्षी एमआयडीसी येथील स्नेहालयात दीपोत्सवाचे आयोजन केले होते. रांगोळ्यांनी सजलेले अंगण, लखलखत्या पणत्यांचा प्रकाश, फटाक्यांची आतषबाजी आणि संगीताच्या तालावर धरलेला ठेका अशा उत्साहपूर्ण वातावरणात वंचित घटकातील मुला-मुलींनी दिवाळीचा आनंद मनमुराद लुटला.

या दीपोत्सवात स्नेहालयासह शहरातील आरएचईबी, बालभवन, बाबावाडी, बालगृह प्रकल्प, आनंद प्रेम संस्था, मानस ग्राम प्रकल्प, हिम्मत ग्राम प्रकल्प, बालगृह टाकळी आणि शासकीय बालगृहातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

वंचित घटकातील मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, त्यांनाही सणाचा आनंद घेता यावा आणि समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन दिवाळी साजरी करावी, या सामाजिक भावनेतून लायन्स क्लबच्या वतीने दरवर्षी या दीपोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी दुष्काळाचे सावट असल्याने हा कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

श्री काळभैरवनाथ जयंतीनिमित्त जातेगावात अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय पर्वणी!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



सुपा : श्री क्षेत्र जातेगाव येथील स्वयंभू क्षेत्रपाल श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने श्री काळभैरवनाथ जयंतीनिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर ते मंगळवार, दि. १ डिसेंबर २०२६ या कालावधीत हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न होणार असल्याची माहिती श्री काळभैरवनाथ देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा सुनिता पोटघन यांनी दिली.

सप्ताहाच्या निमित्ताने दररोज पहाटे काकडा भजन, सकाळी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ, कीर्तन, महाप्रसाद तसेच रात्री हरिजागर व संगीत भजन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यात पंचक्रोशीतील भाविकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग अपेक्षित आहे. या सप्ताहात ह.भ.प. राजाराम महाराज जगताप, व्याख्याते श्री गणेश शिंदे, ह.भ.प. शितलताई साबळे पाटील, ह.भ.प. मारुती महाराज इथापे, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज दोंडकर, ह.भ.प. सचिन महाराज माथेफोड (शास्त्री) आणि ह.भ.प. सुरेश महाराज खेत्रे सर यांच्या कीर्तन व प्रवचनसेवेचा लाभ भाविकांना मिळणार आहे. या सप्ताहात जातेगाव, घाणेगाव, गटेवाडी, भोयरे गांगर्डा, समस्त गायकवाडी भजनी मंडळ, पळवे बुद्रुक, नारायणगव्हाण आणि राळेगणसिद्धी येथील ग्रामस्थांना विविध सेवांचा मान देण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण पंचक्रोशीत धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंगळवार, दि. १ डिसेंबर रोजी ह.भ.प. नवनाथ महाराज माशेरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री काळभैरवनाथ जयंतीनिमित्त आयोजित या अखंड हरिनाम सप्ताहात पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कीर्तन, प्रवचन, धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा सुनिता पोटघन यांनी केले आहे.

श्रीगोंदा न्यायालयात विशेष लोकअदालतीत १२ प्रकरणे तडजोडीने निकाली

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पक्षकारांना वेळ, पैसा आणि मानसिक त्रासातून दिलासा

या लोकअदालतीमुळे अनेक पक्षकारांना न्यायालयाच्या वारंवार फेऱ्या टाळून एकाच दिवसात आपले प्रकरण मिटविण्याची संधी मिळाली. वकिलांनीही पक्षकारांना तडजोडीसाठी प्रवृत्त करून लोकअदालतीच्या कामकाजाला सहकार्य केले. केवळ खटले निकाली काढणे नव्हे, तर सामंजस्यातून वाद मिटवून दोन्ही बाजूंना समाधान देणे, हेच लोकअदालतीचे खरे यश असल्याचे मत दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्रीमती एस. एस. पारखले यांनी व्यक्त केले.

श्रीगोंदा : न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा भार कमी करण्यासह पक्षकारांचा वेळ, पैसा आणि मानसिक त्रास वाचविण्याच्या उद्देशाने श्रीगोंदा येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालयात परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीला पक्षकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, सुनावणीसाठी ठेवण्यात आलेल्या एकूण ५० प्रकरणांपैकी १२ प्रकरणे आपसी सामंजस्याने आणि तडजोडीतून निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्रीमती एस. एस. पारखले यांनी अधिकाधिक प्रकरणे तडजोडीने मिटविण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

यालोकअदालतीमध्ये निकाली निघालेल्या १२ प्रकरणांमधून तब्बल ३६ लाख १२ हजार २५९ रुपयांच्या रकमेचा तडजोडीने निपटारा झाला. संबंधित बँका आणि पतसंस्थांना यामुळे दिलासा मिळाला, तर पक्षकारांनाही दीर्घकाळ चालणाऱ्या न्यायालयीन प्रक्रियेतून मुक्तता मिळाली.

विशेष लोकअदालतीचा मुख्य उद्देश न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने निकाली काढणे, पक्षकारांचा वेळ व पैशांची बचत करणे आणि न्यायालयावरील प्रलंबित खटल्यांचा भार कमी करणे हा होता. या प्रक्रियेत संबंधित प्रकरणांतील पक्षकार आणि विधिज्ञांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपापसातील वाद सामंजस्याने मिटविण्यासाठी सहकार्य केले.

श्रीगोंद्यात चोरट्यांचा नवा डाव! दुचाकीनंतर आता चारचाकींवर डोळा

चाकूने हल्ल्याचा प्रयत्न, सीसीटीव्हीत चोरीचे कारनामे कैद

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : श्रीगोंदा शहराला सध्या चोरीचे ग्रहण लागल्याचे चित्र आहे. घरफोड्यांच्या घटनांपाठोपाठ दुचाकी चोरी आणि आता थेट चारचाकी वाहने पळविण्याचे प्रयत्न सुरू झाल्याने नागरिकांची झोप उडाली आहे. शनिवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी शहरातील विविध भागांत चारचाकी वाहने चोरण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे, एका नागरिकाला चोरट्यांचा प्रकार लक्षात येताच त्याच्यावर धारदार चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे वाहन चोरीचा प्रश्न आता नागरिकांच्या सुरक्षिततेपर्यंत पोहोचला आहे.

यापूर्वी श्रीगोंदा शहरात दुचाकी चोरट्यांनी मोठा धुमाकूळ घातला होता. मात्र, तत्कालीन पोलीस अधिकाऱ्यांनी दुचाकी चोरीची टोळी जेरबंद केल्यानंतर या घटनांना काही प्रमाणात आळा बसला होता. आता दुचाकीनंतर चोरट्यांनी चारचाकी वाहनांकडे मोर्चा वळविल्याचे दिसत आहे.

शनिवारी मध्यरात्री अडीच ते पहाटे साडेतीनच्या दरम्यान मांडवगण रोड परिसरातील यशराज बिल्डिंग तसेच थोरात यांच्या 'जोरात चहा' परिसरात चोरट्यांनी वाहनांचे दरवाजे आणि लॉक तोडून गाड्या सुरू करून पळविण्याचा प्रयत्न केला. यावेळी एका नागरिकाच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्याने चोरट्यांना पाहताच चोरट्यांनी त्याच्यावर धारदार चाकूने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती आहे.

मांडवगण रोडवरील एका अपार्टमेंटमधून चोरट्यांनी कार पळवून नेली. मात्र, काही अंतरावर गेल्यानंतर कारमधील इंधन संपल्याने ती रस्त्यातच सोडून चोरट्यांनी पळ काढला. त्यानंतर चोरट्यांनी आढळगाव रोडवरील दुसरी कार पळवून नेल्याची माहिती समोर आली आहे. या घटनांमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

या चोरीच्या प्रयत्नांमधील काही घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत कैद झाल्याची माहिती आहे. एवढेच नव्हे, तर शहरात काही ठिकाणी दुचाकींच्या टाक्यांमधून पेट्रोल चोरतानाही एक संशयित सीसीटीव्हीत दिसून आला आहे. त्यामुळे आता चारचाकी वाहनेच नव्हे, तर घरासमोर उभ्या असलेल्या दुचाकींचे इंधनही सुरक्षित नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

सातत्याने घडणाऱ्या घरफोड्या, वाहनचोरीचे प्रयत्न आणि इंधन चोरीच्या घटनांमुळे श्रीगोंदा पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. रात्रीची गस्त वाढविणे, सीसीटीव्ही फुटेज तपासणे आणि संशयितांचा माग काढून संबंधित टोळीचा शोध घेणे आवश्यक आहे.

हक्काच्या २१ टीएमसी पाण्यासाठी शेतकरी एकवटले!

कुकडी लाभक्षेत्रातील ४१ गावांमध्ये बैठका घेण्याचा निर्धार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : कुकडी प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे २१ टीएमसी पाणी मिळावे, या मागणीसाठी आता शेतकरी एकवटू लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी धालवाडी व तळवडी येथे हक्काच्या पाण्यासाठी जनजागृती दौरा आयोजित करण्यात आला. यावेळी डिंभे-माणिकडोह बोगदा निर्माण कृती समिती स्थापन करून पारनेर, श्रीगोंदा, कर्जत व करमाळा तालुक्यांमध्ये व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

डिंभे-माणिकडोह टनेलच्या कामाला मा. ना. दिलीप वळसे पाटील यांनी स्थगिती दिल्यामुळे तसेच कुकडी लाभक्षेत्रात ५९ विद्युत प्रकल्पांना मंजुरी मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर भविष्यात शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळणे कठीण होण्याची भीती यावेळी व्यक्त करण्यात आली. त्यामुळे पाण्याच्या प्रश्नावर आता संघटितपणे आणि एकजुटीने लढा उभारण्याची गरज असल्याचे उपस्थितांनी सांगितले. या दौऱ्यादरम्यान ॲड. कैलास शेवाळे, राजेंद्र गुंड, शांतीलाल नाना कोपनर, अशोक जायभाय, डॉ. चम्मस थोरात यांच्यासह दोन्ही गावांतील ज्येष्ठ नागरिक, मान्यवर व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी या लढ्याला मनापासून पाठिंबा दर्शविला. कुकडी लाभक्षेत्रातील ४१ गावांमध्ये टप्प्याटप्प्याने बैठका घेऊन शेतकऱ्यांना एकत्रित करण्यात येणार असून, त्यानंतर तालुकास्तरीय जनआंदोलन उभारण्यात येणार आहे. या लढ्यात कोणतेही राजकीय किंवा वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून हक्काच्या पाण्यासाठी सर्वांनी एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. हक्काचे पाणी मिळवण्यासाठी आता संघटित लढा उभारण्याची वेळ आली असून, शेतकऱ्यांच्या एकजुटीतूनच या आंदोलनाला व्यापक स्वरूप प्राप्त होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

'खंडोबा-बानू विवाह सोहळ्या'ला सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : महानगरपालिकेच्या वतीने आयोजित सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ देखावा स्पर्धेत शनिश्वर प्रतिष्ठान संचलित लोकमान्य टिळक मित्र मंडळाने सादर केलेल्या 'खंडोबा-बानू विवाह सोहळा' या देखाव्याला धार्मिक व आध्यात्मिक देखावे विभागात प्रथम क्रमांक मिळाला. विशेष म्हणजे, मंडळाने सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावत आपली यशाची परंपरा कायम राखली. या यशाबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते मंडळाचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, सार्वजनिक गणेशोत्सवाची संकल्पना लोकमान्य टिळक यांनी सुरू केली. या उत्सवाच्या माध्यमातून समाज एकत्र यावा, विचारांची देवाणघेवाण व्हावी आणि स्वातंत्र्य चळवळीला बळ मिळावे, हा त्यामागील व्यापक उद्देश होता. आजही जनतेने ही परंपरा जपली आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून लोक एकत्र येऊन सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक विचारांची देवाणघेवाण करतात.

गणेश मंडळे देखाव्यांच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीचा वारसा जपत असून पुढील पिढीला प्रेरणा आणि ऊर्जा देण्याचे काम करीत आहेत. लोकमान्य टिळक मित्र मंडळ दरवर्षी धार्मिक, आध्यात्मिक आणि ऐतिहासिक देखावे सादर करून समाजाला चांगला संदेश देत असते. यंदाही मंडळाने 'खंडोबा-बानू विवाह सोहळा' हा देखावा अत्यंत सुंदर पद्धतीने सादर केला. त्याची दखल घेत महानगरपालिकेच्या वतीने मंडळाला मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

इतिहासाची ओळख अन् स्वराज्याचे संस्कार रुजविण्यासाठी किल्ले बनवा स्पर्धा महत्त्वाची!

आ. अक्षय कर्डिले यांचे प्रतिपादन; बालगडवीरांच्या कल्पकतेला मिळाली शाबासकीची थाप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



नगर तालुका : छत्रपती शिवाजी महाराजांचा देदीप्यमान इतिहास, स्वराज्याची प्रेरणा आणि गड-किल्ल्यांचा समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी केवळ इतिहास सांगून चालणार नाही तर तो कृतीतून अनुभवण्याची संधी मुलांना देणे गरजेचे आहे. आजच्या पिढीला आपल्या इतिहासाची ओळख आणि स्वराज्याचे संस्कार मिळण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन आमदार अक्षय कर्डिले यांनी केले.

आमदार अक्षय कर्डिले प्रतिष्ठानच्या वतीने बुऱ्हाणनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'बालगड वीर किल्ले बनवा स्पर्धा २०२६' च्या पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या शौर्याचा, दूरदृष्टीचा, नियोजनाचा आणि स्वराज्य स्थापनेच्या संघर्षाचा इतिहास आजच्या पिढीला माहीत असणे गरजेचे आहे. गड-किल्ले हे आपल्या इतिहासाचे साक्षीदार असून त्यांचे महत्त्व मुलांना समजावे त्यांच्यामध्ये ऐतिहासिक वारशाविषयी अभिमान निर्माण व्हावा या उद्देशाने अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असल्याचे आमदार कर्डिले यांनी सांगितले.

या स्पर्धेत बालगडवीरांनी विविध ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारत आपली कल्पकता आणि कलागुणांचे दर्शन घडविले. विजेत्यांना आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रिया बिंदूले, द्वितीय क्रमांक विजय कदम, तृतीय क्रमांक तेजस शिंदे तर चतुर्थ क्रमांक सार्थक शिंदे यांनी मिळविला.

स्पर्धेचे आयोजन वैभव वाघ, सागर कराळे, सुमित मिरपागार, किरण कर्डिले, प्रकाश केरूळकर, शुभम भस्मे, विशाल वाघ, राहुल आजबे, सर्वेश जाधव, अक्षय बोरुडे, विवेक जाधव व आमदार अक्षयदादा कर्डिले प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आले होते.

भावपूर्ण श्रद्धांजली

दैनिक राष्ट्रसह्याद्री

सोमवार, दि.२३ नोव्हेंबर २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८



अचूक निदान आणि योग्य औषधोपचार हेच रुग्ण बरे करण्याचे सूत्र!

वैद्यकीय क्षेत्रावर आपल्या ज्ञानाचा ठसा उमटविणारे अभ्यासू व्यक्तिमत्त्व : डॉ.एन.जी.चौधरी

रुग्णाच्या आजाराचे अचूक निदान, त्यानुसार योग्य औषधोपचार आणि रुग्णाला लवकरात लवकर ठणठणीत करण्याचे ध्येय, हेच वैद्यकीय सेवेचे खरे सूत्र मानणारे अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. एन. जी. चौधरी! सर्वसामान्यांपासून राजकीय नेते, वरिष्ठ अधिकारी, न्यायाधीश आणि उद्योजकांपर्यंत सर्वच स्तरांतील लोकांमध्ये लोकप्रिय असलेले डॉ. चौधरी नुकतेच काळाच्या पडद्याआड गेले. मात्र, आपल्या प्रदीर्घ वैद्यकीय सेवेतून, अफाट ज्ञानातून आणि रुग्णांविषयीच्या आत्मीयतेतून त्यांनी श्रीरामपूरच्या वैद्यकीय क्षेत्रावर उमटविलेला ठसा दीर्घकाळ कायम राहील. श्रीरामपूरचे पहिले एम.डी. डॉक्टर म्हणूनही त्यांची विशेष ओळख होती.

पद्माकर शिंपी
ज्येष्ठ पत्रकार, श्रीरामपूर

डॉ. नारायण गणपत चौधरी यांचा जन्म १५ जुलै १९४६ रोजी पाथर्डी तालुक्यातील जोहारवाडी येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जोहारवाडी येथे, तर माध्यमिक शिक्षण तिसगाव येथील सिद्धेश्वर विद्यालयात झाले. पुढे पुण्यातील बी. जे. मेडिकल कॉलेजमधून १९७२ मध्ये त्यांनी एम.बी.बी. एस.ची पदवी गुणवत्तायादीत मिळवली. त्यानंतर १९७५ मध्ये एम.डी. पदवी संपादन करताना त्यांनी सुवर्णपदकही पटकावले. विशेष म्हणजे, एम.डी.चे शिक्षण सुरू असतानाच त्यांचा विवाह झाला होता.

एम.डी.ची पदवी प्राप्त केल्यानंतर १९७५ मध्ये त्यांनी श्रीरामपूर येथील गिरमे बिल्डिंगमध्ये रुग्णसेवेला प्रारंभ केला. आजाराचे अचूक निदान आणि योग्य औषधोपचार यांमुळे अल्पावधीतच त्यांची ख्याती सर्वदूर पसरली. रुग्णांचा वाढता विश्वास आणि उपचारांचा सकारात्मक अनुभव यामुळे त्यांची वैद्यकीय प्रॅक्टिसही वेगाने विस्तारली. सुमारे चार वर्षांनंतर त्यांनी आपला दवाखाना काँग्रेस भवनमधील तळमजल्यावर हलविला. त्या ठिकाणी अन्य डॉक्टरांचेही दवाखाने होते. पुढे तेथूनही त्यांनी आपली प्रॅक्टिस स्वतःच्या निवासस्थानी सुरू केली.

डॉ. चौधरी यांचा नावलौकिक दिवसेंदिवस वाढत गेला. श्रीरामपूर तालुक्यासह संगमनेर, कोपरगाव, राहुरी, अकोले, नेवासा अशा अनेक भागांतून रुग्ण त्यांच्याकडे उपचारासाठी येत असत. त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णांमध्ये सर्वसामान्य कष्टकरी माणसांपासून राजकीय पुढारी, त्यांचे नातेवाईक, वरिष्ठ शासकीय अधिकारी, न्यायाधीश आणि उद्योजक अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तींचा समावेश होता. मात्र, त्यांनी कधीही श्रीमंत आणि सामान्य असा भेदभाव केला नाही. केवळ उच्चभ्रू वर्गाचे डॉक्टर अशी प्रतिमा त्यांनी कधीच निर्माण होऊ दिली नाही. प्रत्येक रुग्णाला योग्य उपचार मिळाले पाहिजेत, हीच त्यांची भूमिका होती.

सहकाराची मुहूर्तमेढ ग्रामीण भागात रोवणारे सहकारमहर्षी पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील, सौ. सिंधूताई विखे पाटील, विविध तालुक्यांतील आमदार व राजकीय नेते, रामदास पाटील धुमाळ, भानुदास मुरकुटे, आदिक कुटुंबीय, ससाणे, थोरात, कांबळे, देशमुख, कदम, चुग, शेख, पठाण यांच्यासह अनेक प्रतिष्ठित कुटुंबे आणि असंख्य सर्वसामान्य नागरिक त्यांच्या रुग्णांमध्ये होते. मधुमेह, हृदयरोग आणि मेंदूविकारांच्या उपचारांमध्ये त्यांचा विशेष हातखंडा होता.

डॉ. चौधरी यांच्याच काळात पाथर्डी येथे शिक्षण घेतलेले आणि गुणवत्तेत चमकलेले प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. एन. बी. तुपे यांनी प्रसूतिगृह सुरू केले होते. याच प्रसूतिगृहात डॉ. एन. जी. चौधरी यांच्या दोन कन्या गौरी व स्मिता आणि मुलगा प्रफुल्ल यांचा जन्म झाला. या आठवणी त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनातील एक जिव्हाळ्याचा दुवा होत्या.

वैद्यकीय क्षेत्रातील त्यांच्या ज्ञानाची व्याप्ती केवळ नियमित उपचारांपुरती मर्यादित नव्हती. २००६ मध्ये चेन्नई येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये तेथील तज्ज्ञ डॉक्टरांना सहकार्य करताना त्यांनी महाराष्ट्रातील एका रुग्णावर 'ट्रायजेमिनल न्यूरॅल्जिया' या आजारासंदर्भातील अत्यंत अवघड शस्त्रक्रिया रोबोटिक पद्धतीने केली. ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली. वैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन संशोधन, आधुनिक उपचारपद्धती आणि औषधांमधील बदल यांचा ते सातत्याने अभ्यास करत असत. मेडिकल सायन्समधील कोणतेही नवीन संशोधन समोर आले की ते आवर्जून वाचत. अनेक महत्त्वाच्या वैद्यकीय नियतकालिकांचे ते नियमित वाचक होते. त्यांच्याकडे दुर्मिळ वैद्यकीय पुस्तकांचा मोठा संग्रह होता. वेळ मिळेल तेव्हा वाचन आणि अभ्यास करणे हा त्यांच्या दिनक्रमाचा अविभाज्य भाग होता. त्यामुळे त्यांचे वैद्यकीय ज्ञान नेहमी अद्ययावत राहिले.

रुग्णांच्या उपचारांमध्ये पारदर्शकता आणि स्वातंत्र्य असावे, यावर त्यांचा विशेष भर होता. एखाद्या विशिष्ट दुकानातूनच औषधे घ्यावीत किंवा अमुक एका ठिकाणीच तपासण्या कराव्यात, असा आग्रह त्यांनी कधीच धरला नाही. रुग्णांना आपल्या सोयीनुसार औषधे आणि तपासण्यांची व्यवस्था करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असे. मात्र, तपासणी अहवालात चुकीची माहिती किंवा मोठी तफावत आढळल्यास ते त्याचा गांभीर्याने पाठपुरावा करत. त्याचप्रमाणे डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांऐवजी मेडिकल व्यावसायिकांनी परस्पर दुसरे औषध दिल्यास ते त्यावर आक्षेप घेत. औषधातील घटक समान असले तरी प्रत्येक औषधाचा परिणाम, गुणवत्ता आणि रुग्णाच्या दृष्टीने असलेले महत्त्व वेगळे असू शकते, हे ते ठामपणे समजावून सांगत. या बाबतीत ते कोणाचीही भीडभाड ठेवत नसत.

डॉ. चौधरी स्पष्टवक्ते आणि परखड स्वभावाचे होते. दुपारच्या जेवणाच्या वेळेतही विविध औषध कंपन्यांचे वैद्यकीय प्रतिनिधी (एम.आर.) त्यांना भेटण्यासाठी येत. डॉक्टर जेवायला बसलेले असले तरी ते ताटावरून उठून प्रतिनिधींना भेटत, त्यांचे म्हणणे ऐकून घेत आणि संबंधित कंपनीच्या औषधांविषयी रुग्णांवर उपचार करताना आलेले अनुभव त्यांच्यासमोर मांडत. हे अनुभव कंपनीपर्यंत पोहोचवावेत, असा त्यांचा आग्रह असे. औषध कंपन्या आणि डॉक्टर यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणजे वैद्यकीय प्रतिनिधी. त्यांच्यावर कंपनीने दिलेली उद्दिष्टे पूर्ण करण्याचा दबाव असतो. त्यामुळे आपल्यामुळे त्यांच्या भेटी किंवा कामात अडथळा येऊ नये, अशी त्यांची भूमिका होती. कुटुंबीय जेवणासाठी आग्रह करत असतानाही ते प्रथम प्रतिनिधींना वेळ देत असत.

डॉ. चौधरी यांच्या अभ्यासू वृत्तीची आणि अचूक निदानक्षमतेची दखल औषध कंपन्याही घेत असत. अमिताभ बच्चन यांच्याशी संबंधित एका कंपनीने त्यांच्या सूचनांची दखल घेऊन कंपनीच्या कार्यालयात दर्शनी भागात डॉ. चौधरी यांचा संदेश लावला होता. त्यांच्या वैद्यकीय अनुभवाला आणि सूचनांना मिळालेली ही एक प्रकारची पावतीच होती.

वैद्यकीय व्यवसायामुळे डॉ. चौधरी यांचा राजकीय नेते, विविध क्षेत्रांतील पुढारी, वरिष्ठ अधिकारी आणि समाजातील सर्व स्तरांतील लोकांशी सातत्याने संपर्क येत असे. या संपर्कातून त्यांना राजकारण, समाजकारण आणि सामाजिक घडामोडींची मोठी माहिती मिळत असे. मित्रमंडळी किंवा पत्रकारांशी गप्पा मारताना ते अनेकदा महत्त्वपूर्ण आणि ठोस माहिती सांगत. मात्र, ती माहिती नेमकी कोणाकडून मिळाली, याचा उल्लेख ते कधीच करत नसत. मेन रोडवरील हरभजन क्लॉथ येथे भरणारा बळवंत भुवन कट्टा डॉक्टरांचा मित्रमंडळीची गप्पांचा कट्टा होता. सकाळच्या चहाच्या निमित्ताने मित्रमंडळींची तासांपास सामाजिक राजकीय विषयावर गप्पा करणे डॉक्टरांचा छंद होता. गप्पांच्या ओघात माहिती संकलित करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती.

डॉ. चौधरी प्रत्येक गोष्टीकडे चिकित्सक दृष्टिकोनातून पाहत. एखादी बाब केवळ परंपरा किंवा अंधश्रद्धेच्या आधारावर स्वीकारण्याऐवजी तिची सत्यासत्यता तपासून मगच ते निष्कर्ष काढत. त्यामुळे काहींना ते नास्तिक वाटत असत. मात्र, वैद्यकीय शास्त्राबरोबरच ज्योतिषशास्त्राचाही त्यांचा अभ्यास होता. व्यावसायिक ज्योतिषांपेक्षा अभ्यासू ज्योतिषांशी चर्चा करण्यात त्यांना अधिक रस असे. पंचांगातील काही बाबी अभ्यासासाठी उपयुक्त असून त्यातील गणिती भाग महत्त्वाचा आहे, असे ते सांगत. कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करून त्यातील तथ्य शोधण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण अधोरेखित करणारी होती.

गेल्या दीड-दोन वर्षांपासून त्यांच्या प्रकृतीत काहीशी चढ-उतार होत होती. अधूनमधून ते आजारी पडत; उपचारांनंतर पुन्हा बरे होऊन नव्या उत्साहाने कामाला लागत. डॉ. मोरगे यांनीही त्यांच्यावर वेळोवेळी प्रयत्नपूर्वक उपचार केले. मात्र, अखेर नियतीपुढे सर्व प्रयत्न अपुरे ठरले. १४ नोव्हेंबर रोजी त्यांच्या निधनाने श्रीरामपूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील एक महत्त्वाचा अध्याय संपला. त्यांच्या जाण्याने केवळ एक निष्णात डॉक्टरच नव्हे, तर अभ्यासू वृत्तीचा, स्पष्टवक्तेपणाचा आणि माणुसकी जपणारा मार्गदर्शकही हरपला.

डॉक्टर म्हणून त्यांनी मिळवलेली प्रतिष्ठा, रुग्णांचा संपादन केलेला विश्वास, वैद्यकीय क्षेत्रातील अद्ययावत ज्ञानाची ओढ आणि प्रत्येक रुग्णाला योग्य उपचार देण्याची तळमळ हीच त्यांची खरी ओळख होती. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे. त्यांच्या आठवणी आणि वैद्यकीय क्षेत्रातील योगदान कायम स्मरणात राहील.अशा या ज्ञानसंपन्न, अभ्यासू आणि रुग्णसेवेला वाहून घेतलेल्या डॉ. एन. जी. चौधरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

भावपूर्ण
श्रद्धांजली!

''आता सहवास नसला तरी, स्मृति सुगंध देत राहील
जीवनाच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुमची येत राहील''



कळविण्यास अत्यंत दुःख होते की,

कै.डॉ.नारायण गणपत चौधरी

यांना शनिवार, दि.१४/११/२०२६ रोजी
रात्री ९.०५ मि.देवाज्ञा झाली त्यांचा

।। दशक्रियाविधी ।।

सोमवार, दि.२३/११/२०२६ रोजी स. ९.३० वा. होणार आहे.
परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो!

- आपले दुःखांकित -

कांता नारायण चौधरी (पत्नी)
प्रफुल्ल नारायण चौधरी (मुलगा)
गौरी मिलिंद पाटील (मुलगी)
अस्मिता अजित सुर्वे (मुलगी)
दिगंबर चंद्रभान चौधरी (पुतणे)
राजेंद्र चंद्रभान चौधरी (पुतणे)
बाळासाहेब विठ्ठल चौधरी (पुतणे)
प्रकाश विठ्ठल चौधरी (पुतणे)

जगन्नाथ गणपत चौधरी (भाऊ)
सोपान गणपत चौधरी (भाऊ)
सतिष रघुनाथ चौधरी (पुतणे)
सुरेश जगन्नाथ चौधरी (पुतणे)
गोविंद रघुनाथ चौधरी (पुतणे)
अभिजीत सोपान चौधरी (पुतणे)
जितेंद्र सोपान चौधरी (पुतणे)

समस्त चौधरी परिवार

ठिकाण - गुजराती मंगल कार्यालय, वॉर्ड नं.७, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर



कै.डॉ.एन.जी.चौधरी
यांना दशक्रियाविधीनिमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली!

बळवंत भुवन मित्र मंडळ, श्रीरामपूर

श्री.रमेश लोढा
श्री.सुरेंद्र नाना गिरमे
श्री.जयंत गिरमे
श्री.हरी पाटील पटारे
श्री.भाऊसाहेब मोरे
श्री.विणोद पाटणी
श्री.अविनाश आपटे काका
श्री.रमेश कोठारी
श्री.ॲड.शिवाजी टेकावडे
श्री.नंदू खटोड
श्री.गंगानाथ देशपांडे
श्री.सुनील देव
श्री.हरचरणसिंग चुग
श्री.ॲड.बाबा औताडे
श्री.शेखर पाठक सर
श्री.ॲड.शिवाजी शेळके
श्री.करण नवले



कै.डॉ.एन.जी.चौधरी
यांना
दशक्रियाविधीनिमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली!

निरज मुरकुटे
संचालक
अशोक सहकारी साखर कारखाना लि; अशोकनगर, ता.श्रीरामपूर

सौ.मंजुश्री मुरकुटे
नगरसेविका
श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर



कै.डॉ.एन.जी.चौधरी
यांना
दशक्रियाविधीनिमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली!

श्री.आशिष धनवटे
नगरसेवक
श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर



कै.डॉ.एन.जी.चौधरी
यांना दशक्रियाविधीनिमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली!

हॉटेल अमर प्युअर व्हेज
एस.टी.स्टँडसमोर, श्रीरामपूर
प्रोप्रा. महेश गुप्ता



कै.डॉ.एन.जी.चौधरी
यांना दशक्रियाविधीनिमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली!

डॉ.महेश क्षीरसागर
व त्रिमुर्ती आयुर्वेद परिवार
कांदा मार्केट, श्रीरामपूर



कै.डॉ.एन.जी.चौधरी
यांना दशक्रियाविधीनिमित्त
भावपूर्ण श्रद्धांजली!

मनिषा मेडिकल & जनरल स्टोअर्स
भळगट हॉस्पिटल शेजारी,
वॉर्ड नं.७, श्रीरामपूर
प्रोप्रा. जालिंदर भवार